रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३७
www.ramprahar.com

शनिवार, २३ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग

मिशन शक्ती अंतर्गत पाळणा योजनेची अंमलबजावणी/२

गणेशमूर्तींचे माहेरघर पेणमधून ४५ हजार बाप्पांची परदेशवारी/५

रायगड जिल्हा बास्केटबॉल निवड चाचणी खारघरला/८

## देशात ऑनलाईन फॅन्टसी गेमिंगवर अखेर बंदी



**नवी दिल्ली :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनात सरकारने ऑनलाईन मनी गेमिंगवर बंदी घालणारे विधेयक मांडले होते. लोकसभा आणि राज्यसभेत मंजूर झाल्यानंतर या विधेयकाला शुक्रवारी (दि. २२) अखेर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही मंजुरी मिळाली. म्हणजेच आता या ऑनलाईन गेमिंगवर बंदी घालणाऱ्या या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले आहे. केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञानमंत्री अश्विनी वैष्णव यांनी हे विधेयक दोन्ही सभागृहात मांडले होते. देशातील ऑनलाईन गेमिंग उद्योग ३.८ अब्जांचा आहे. दरम्यान, विधेयक मंजूर झाल्यापासून ड्रीम ११ आणि माय इलेव्हन सर्कलसारख्या फॅन्टसी गेमिंग ॲप्सनी त्यांच्या प्लॅटफॉर्मवर रिअल मनी गेम्स बंद केले आहेत. या कायद्यानुसार दोषींना तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि एक कोटी रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे.

## आजपासून पनवेलमध्ये जिल्हास्तरीय भजन स्पर्धा : लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पर्वणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने पनवेल शहरातील मार्केट यार्डमधील मंडळाच्या सभागृहात दोन दिवसीय रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.





या स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी (दि. २३) सकाळी ९.३० वाजता लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पं. शंकरराव वैरागकर, बंडाराज घाडगे, नंदकुमार पाटील, हभप निवृत्तीबुवा चौधरी, शंकुनाथबुवा पडघेकर, महादेवबुवा शहाबाजकर, 'सारेगम'फेम जितेंद्र तुपे, इंडियन आयडॉल विजेता सागर म्हात्रे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

स्पर्धा पुरुष खुला आणि महिला खुला अशा दोन गटात होणार आहे. प्रथम पारितोषिक ५१ हजार रुपये, द्वितीय २५ हजार रुपये, तृतीय १५ हजार रुपये, उत्तेजनार्थ पारितोषिक सात हजार रुपये तसेच उत्कृष्ट पखवाज वादक व उत्कृष्ट तबला वादक यांना प्रत्येकी सात हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह असे आहे.

दोन दिवस रंगणाऱ्या या स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण सोहळा २४ ऑगस्टला सायंकाळी ६.३० वाजता होणार आहे.

भजनप्रेमी रसिकांनी स्पर्धेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर विकास मंडळाचे अध्यक्ष व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, मंडळाचे सचिव परेश ठाकूर व आयोजन समितीने केले आहे.

# विकास प्रक्रियेत महिलांचा सहभाग आवश्यक

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शक्ती संवादात प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

विकसित महाराष्ट्र २०४७चे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विकासाच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढविणे गरजेचे आहे. शक्ती संवादाच्या माध्यमातून महिला सुरक्षा आणि सक्षमीकरणाबाबत चर्चा आणि विचार मंथन होत असून यावर सकारात्मक विचार करून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.




राष्ट्रीय महिला आयोग व महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय शक्ती संवाद कार्यक्रमाचे हॉटेल ट्रायडंट येथे आयोजन करण्यात आले. त्या वेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या कार्यक्रमास विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, महिला व बाल विकास राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर, आमदार चित्रा वाघ, मनीषा चौधरी, विद्या ठाकूर, सदस्य सचिव नंदिनी आव्हाडे, सहसचिव राधिका चक्रवर्ती यांच्यासह विविध राज्यातील महिला आयोगाच्या अध्यक्ष, सहसचिव, सदस्य उपस्थित होते. या वेळी पॉश कायद्यासंदर्भातील पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. दोन दिवस शक्ती संवादाच्या माध्यमातून राज्यासह देशातील महिलांच्या विविध समस्या आणि त्यावर उपाय या संदर्भात चिंतन-मंथन होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत २०४७च्या स्वप्नपूर्तीसाठी महिलांचा सामाजिक आणि आर्थिक प्रगतीत सहभाग आवश्यक आहे.

महिलांच्या सुरक्षेसाठी राज्य शासन कार्यरत असून महिला सक्षम होण्याच्या दिशेने राज्यात गतीने कार्यक्रम राबविले जात आहेत. शहरांसह ग्रामीण भागातील शेवटच्या घटकातील महिलांपर्यंत योजना राबविल्यास सकारात्मक परिणाम दिसतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर म्हणाल्या की, देशभरात विविध राज्यातील महिला आयोग महिलांच्या संरक्षणासाठी कार्यरत आहे. सर्व राज्यांनी एकत्रितरित्या काम केल्यास अधिक चांगले परिणाम साधता येतील. महाराष्ट्रात उद्योग जास्त असल्याने प्रत्येक कार्यालयात पॉश ॲक्टसंदर्भात समिती कार्यरत असणे गरजेचे असून त्यासाठी प्रयत्न करणार आहे. महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनीही विचार मांडले.

## भजनी मंडळांना भांडवली अनुदान

**मुंबई : प्रतिनिधी**

यंदापासून प्रथमच गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आला आहे. यानिमित्ताने राज्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून राज्यभरातील १,८०० भजनी मंडळांना भजन साहित्य खरेदीसाठी २५ हजार रुपये भांडवली अनुदान वितरण करण्यात येणार आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिली.

याबाबतचे ऑनलाईन अर्ज २३ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत https://mahaanudan.org या वेबपोर्टलवर उपलब्ध आहेत. जास्तीत जास्त भजनी मंडळांनी या अनुदानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. शेलार यांनी केले आहे.

## रायगड जि.प., पं.स. निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या आगामी निवडणुकीसाठी मतदारसंघांची अंतिम प्रभाग रचना अधिसूचना जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेचे ५९ गट, तर १५ तालुका पंचायत समित्यांचे एकूण ११८ गण आहेत.

२०२२मध्ये जिल्हा प्रशासनाने प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा तयार करून तो राज्य सरकारकडे पाठवला होता. त्या वेळी २०२१ची संभाव्य जनगणना लक्षात घेऊन प्रभाग रचना करण्यात आली होती. नवीन प्रभाग रचनेनुसार जिल्हा परिषदेच्या मतदारसंघासाठी संख्या ६६, तर पंचायत समितीच्या प्रभागांची संख्या १३२ होणार होती. म्हणजेच जिल्हा परिषदेची प्रभाग संख्या सातने, तर पंचायत समितीच्या प्रभागांची संख्या १४ने वाढणार होती, मात्र कोविड काळामुळे २०२१ची जनगणना झालीच नाही. त्यामुळे या प्रभाग रचनांवर आक्षेप घेण्यात आले, ज्यामुळे पुन्हा एकदा २०११ची जनगणना ग्राह्य धरून प्रभाग रचना करण्याचा निर्णय घेण्यात आला. परिणामी २०१७मध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीप्रमाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांचे प्रभाग कायम राहिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणाचा विचार न करता निवडणुका तातडीने घ्याव्यात, असे आदेश दिल्यानंतर यंत्रणा कामाला लागली आणि ही अधिसूचना जाहीर झाली आहे. प्रारूप आदेशाच्या प्रती जिल्ह्यातील सर्व तहसीलदार कार्यालये आणि पंचायत समिती कार्यालयात पहायला मिळणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली. **(पान २ वर..)**

# गणेशमूर्ती कार्यशाळांमध्ये लगबग वाढली

## बाप्पांवर शेवटचा हात फिरवण्यात कारागीर मग्न

**अलिबाग : प्रतिनिधी**

गणेशोत्सव अवघ्या पाच दिवसांवर आल्याने गणेशमूर्ती तयार करणाऱ्या कार्यशाळांमध्ये कारगिरांची धावपळ सुरू आहे. बाप्पाच्या मूर्ती भाविकांना वेळेत मिळाव्या यासाठी कारखान्यांमध्ये लगबग असून मूर्तींवर शेवटचा हात फिरवला जात आहे. गतवर्षीच्या तुलनेत मूर्तींच्या किमतीत २५ ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. तरीही मोठ्या हौसेने गणेशभक्तांनी मूर्ती बूक केल्या आहेत.



पेण शहरातील गणपतींच्या मूर्तींना केवळ मुंबई, पुण्यातूनच नव्हे तर गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश या राज्यांमधील गणेशभक्तांचीदेखील मागणी आहे. या राज्यांमध्ये गणेशोत्सवाच्या काही दिवस आधीच मूर्ती पाठवाव्या लागतात. शिवाय परदेशात पाठविण्यासाठी विशेष नियोजन करून मूर्ती रवाना केल्या जातात. जिल्ह्यातील प्रत्येक गावात गणेशमूर्ती तयार केल्या जातात. तेथेदेखील रंगकाम, सजावटीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

सध्या गणेशमूर्तीवर शेवटचा हात फिरविण्यात कारागीर मग्न आहेत. कुशल कारागीर मिळत नसल्यामुळे मूर्ती तयार करण्यात काही अडचणी निर्माण होत आहेत. उपलब्ध असलेल्या कारागिरांकडून मूर्ती वेळेत तयार करून रंगवून घेण्यासाठी कारखान्यांच्या मालकांची सध्या धावपळ सुरू आहे.

### किमतीसह मागणीतही वाढ

मूर्ती तयार करण्यासाठी लागणारी माती, प्लास्टर ऑफ पॅरिस, रंग यांच्या किमती वाढल्या आहेत. वाहतुकीचा खर्च व कामगारांचा पगारही वाढला आहे. त्यामुळे यंदा गणेशमूर्तींच्या किमतीत २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तरीदेखील गणेशभक्तांच्या उत्साहावर त्याचा परिणाम झालेला नाही. उलट गणेशमूर्तींच्या मागणीमध्ये यंदा वाढ झाली आहे.

## सजावटींच्या साहित्याने बाजारपेठा सजल्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाला अवघे काही दिवस उरले आहेत. भाविक गणरायाच्या स्वागताच्या तयारीला लागले असून सजावटीचे काम सुरू आहे. त्यामुळे सजावटीसाठी लागणाऱ्या साहित्याने बाजारपेठा सजल्या आहेत. बाजारात वेगवेगळ्या प्रकारची कृत्रिम फुले, फुलांच्या माळा, रोषणाईकरिता लागणारे दिवे, विविध प्रकारची तोरणे, आकर्षक मखरे विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

थर्माकोलचा वापर पर्यावरणासाठी घातक असल्याने त्यांच्या वापरावर काही वर्षांपूर्वी बंदी आणण्यात आली. त्यामुळे कलाकारांनी थर्माकोलच्या वस्तूंनी होणारे प्रदूषण टाळण्यासाठी थर्माकोलला पर्याय असलेल्या वस्तूंचा वापर करीत पर्यावरणपूरक मखरांची निर्मिती सुरू केली. सध्या बाजारात पर्यावरणपूरक मखरे पहायला मिळतात. ही मखरे गणेशभक्तांच्या पसंतीला पडत आहेत. साधारण दीड हजारांपासून साडेआठ हजार रुपये किमतीची मखरे सध्या बाजारात उपलब्ध आहेत.

जिल्ह्यातील बाजारपेठा सजावटीच्या साहित्याने सजल्या आहेत. रंगीत कागद, विद्युत रोषणाईच्या माळा, कृत्रिम फुलांचे हार, फुलदाणी अशा वस्तू विक्रीसाठी आल्या आहेत. एलईडी बल्बच्या माळांना भरपूर मागणी आहे. याशिवाय फळे, फुले व पानांची सुंदर तोरणेही बाजारात उपलब्ध असून ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत.



## रेल्वेच्या गणपती विशेष ३८० फेऱ्या

**रोहा : प्रतिनिधी**

भारतीय रेल्वेने या वर्षीच्या गणेशोत्सवाच्या काळात भाविकांसाठी सुसह्य आणि आरामदायी प्रवास सुनिश्चित करण्याकरिता ३८० गणपती विशेष रेल्वे फेऱ्यांचे नियोजन केले आहे, जी आतापर्यंतची विक्रमी संख्या आहे.

कोकणासह महाराष्ट्रातील प्रवासांची मोठी मागणी लक्षात घेऊन मध्य रेल्वेच्या २९६, पश्चिम रेल्वेच्या ५६, कोकण रेल्वेच्या सहा, तर दक्षिण रेल्वेच्या २२ फेऱ्या चालवल्या जाणार आहेत. यामध्ये पनवेल-चिपळूणदरम्यान सहा अनारक्षित विशेष गाड्यांचा समावेश आहे.

गणेशोत्सव २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबरदरम्यान साजरा होणार असून ११ ऑगस्टपासूनच गणपती विशेष रेल्वेसेवा सुरू झाल्या आहेत. या विशेष रेल्वेसेवांचा विस्तार कोकण रेल्वे, मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वे मार्गांवर झाला असून रेल्वेगाड्यांचे थांबे वाढविण्यात आले आहेत. या रेल्वेसेवांबाबत अधिक माहिती आयआरसीटीसी वेबसाईट, रेल्वे वन ॲप आणि संगणकीकृत पीआरएसवर उपलब्ध आहे.



# मिशन शक्ती अंतर्गत पाळणा योजनेची राज्यात अंमलबजावणी - मंत्री तटकरे



**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या मिशन शक्ती अंतर्गत सामर्थ्य या उपक्रमामध्ये महिलांना नोकरीदरम्यान मुलांची काळजी घेता यावी, यासाठी ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील मुलांसाठी अंगणवाडीत पाळणा ही योजना सुरू करण्यात आली आहे. यामुळे कामगार व नोकरदार महिलांना मोठा दिलासा मिळणार असून मुलांच्या संगोपनासाठी सुरक्षित व दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यात ३४५ ठिकाणी ही पाळणाघरे सुरू करण्यात येणार आहेत. पाळणाघरांमध्ये डे-केअर सुविधा, पूर्व शालेय शिक्षण, पूरक पोषण आहार, वाढीचे निरीक्षण, आरोग्य तपासणी, लसीकरण आदी सुविधा दिल्या जाणार आहेत. तसेच मुलांना दिवसातून तीन वेळा म्हणजेच सकाळचा नाश्ता, दुपारचे गरम शिजवलेले जेवण आणि संध्याकाळचा नाश्ता देण्यात येईल.पाळणा घर महिन्यात २६ दिवस, दररोज ७.५ तास सुरु राहील, यामध्ये जास्तीत जास्त २५ मुले असतील. याठिकाणी एक पाळणा सेविका व एक पाळणा मदतनीस नेमण्यात येईल. बालस्नेही शौचालय यांसारख्या सुविधा उपलब्ध असणार आहेत. या कार्यक्रमाअंतर्गत अंगणवाडी सेविका यांना १५०० प्रतिमाह भत्ता देण्यात येणार आहे. अंगणवाडी मदतनीस यांना ७५० प्रतिमाह, पाळणा सेविका मानधन यांना ५५०० प्रतिमाह,भत्ता देण्यात येणार आहे.

## मांदाड ते मांदाड पूल रस्त्यावरील खड्डे भरल्याने प्रवाशांमध्ये समाधान

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील तळा -मांदाड-आगरदांडा या रस्त्यावरील मांदाड-मांदाड पुल (खाजणी) रस्त्या दरम्यान अंदाजे एक किमी रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले होते. हे खड्डे भरल्याने वाहनचालक व प्रवासी वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.



तळा तालुक्यासाठी सहा तालुक्यांना जोडणारा हा मांदाड पुल असून या पुलावरून मुरूडकडे अनेक प्रवासी या मार्गावरून प्रवास करत असतात मात्र या मार्गावर मांदाड गाव ते पुलापर्यंतच्या रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले होते. वाहनचालकाला वाहन चालविताना मोठी कसरत करून वाहन चालवावे लागत होते

बांधकाम विभागाने गणेशोत्सवापूर्वी रस्त्यावरील खड्डे भरल्याने येथून प्रवास करणे आता सुखकर झाल्याचे समाधान मिळत आहे

## आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धा

### सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये शाळा अंतर्गत पारितोषिक वितरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोशिश फाउंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धा २०२५ च्या शाळा अंतर्गत फेरीचा पारितोषिक वितरण सोहळा सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. या स्पर्धेतून निवड झालेले एकूण २७ विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे देण्यात आली.


या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर प्रभावी मांडणी करून आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व कौशल्याचा विकास, आत्मविश्वास वृद्धी तसेच समाजघडणीसाठी वक्तृत्वाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी ही स्पर्धा उपयुक्त ठरली. कार्यक्रमाचे सुयोग्य आयोजन शाळेतील शिक्षक व कोशिश फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी केले.निवड झालेले विद्यार्थी आता पुढील फेरीत शाळेचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापक मुक्ता खटावकर म्हणाल्या कि, या वक्तृत्व स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळाले आहे. विशेष म्हणजे, ही उपक्रमशील स्पर्धा राबवण्यासाठी 'कोशिश फाऊंडेशन'ने घेतलेला पुढाकार खरोखरच प्रशंसनीय आहे. त्यांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य संधी मिळाली या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, उलवे नोड १ अध्यक्ष निलेश खारकर, उलवे नोड युवा मोर्चा अध्यक्ष धीरज ओवळेकर, वितेश म्हात्रे, सुहास गोंधळी, अभिमन्यू दापोलकर, प्रणय कडू आदी उपस्थित होते.

## महाड शहरातील रस्त्यांवर खड्डेच खड्डे, नागरिक त्रस्त

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन तत्कालीन नगराध्यक्ष स्वर्गीय सुधाकर सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील बहुतांश रस्ते काँक्रिट करण्यात आले होते. या रस्त्यांना आता खड्डे पडले आहेत. हे खड्डे बुजवण्यासाठी पैसा खर्च केला गेला मात्र अवघ्या महिनाभरातच टाकलेल्या डांबराचे डोंगर तयार झाले आहेत. यामुळे खड्डे बरे होते अशी प्रतिक्रिया संतप्त नागरिक व्यक्त करत आहेत.



जवळपास वीस वर्षानंतर या रस्त्यांना आता खड्डे पडले आहेत. काँक्रीट रस्ते असल्याकारणाने यावर पडलेले खड्डे काँक्रिटनेच भरणे आवश्यक आहे मात्र या ठिकाणी डांबराचे पॅच मारून खड्डे भरले जात आहेत. तर काही ठिकाणी केवळ खडी टाकून खड्डे भरल्याचे भासवले गेले आहे. यामुळे दुचाकी आणि इतर वाहन चालकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. खड्डे भरण्याकरता पावसाळ्यापूर्वी प्रक्रिया सुरू करणे आवश्यक होते मात्र भर पावसामध्ये खड्डे भरण्याची प्रक्रिया महाड नगरपालिकेकडून करण्यात आली होती यामुळे डांबर मिश्रित साहित्याने भरलेले खड्डे अवघ्या एक महिन्यातच उघडे पडले.

महाड शहरातील एसटी स्थानक ते छ. शिवाजी महाराज चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते दस्तुरी नाका, दस्तुरी नाका ते चवदार तळे, कोटेश्वर ते उभा मारुती, उभा मारुती ते पंचायत समिती, पंचायत समिती पासून काकरतळे, एसटी स्टँड पासून काकरतळे मोहल्ला ते काकरतळे मैदान, वीरेश्वर मंदिर ते दादली पूल, महाड आयटीआय पासून बडोदा बँक, अशा अनेक रस्त्यांवर सध्या खड्ड्यांचे साम्राज्य पसरलेले आहे. या सगळ्या रस्त्यांच्या नूतनीकरणासाठी करोडो रुपयांची आवश्यकता आहे. तसेच या रस्त्यांच्या नूतनीकरणासाठी मास्टर प्लॅन तयार होणे आवश्यक आहे. सिमेंट काँक्रीट रस्त्यांवर टाकण्यात येणारा डांबर हा निकृष्ट दर्जाचा असल्याने त्यातील खडी आणि इतर मटेरियल अवघ्या पंधरा दिवसातच बाहेर पडत आहे. यामुळे नागरिकांचे मात्र चांगलेच हाल होताना दिसत आहेत.

> **गणेशोत्सवापूर्वी खड्डे भरण्याचे काम सुरू केले जात आहे. काही ठिकाणी खड्डे भरण्याचे काम सुरूदेखील झालेले आहे. नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी पालिका प्रशासनाकडून घेतली जाईल.**
>
> **-धनंजय कोळेकर, मुख्याधिकारी, महाड**

## जादा भाडे आकारणाऱ्या खासगी बस व रिक्षाविरुद्ध करा तक्रार

**रायगड : रामप्रहर वृत्त**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जादा भाडे आकारणाऱ्या खासगी कंत्राटी प्रवासी बस व रिक्षा यांचे विरुध्द वाहन क्रमांक व प्रवासाच्या तपशीलासह तक्रार करण्याचे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल हरिभाऊ जेजूरकर यांनी केले आहे.

राज्यात आगामी सुरू होणाऱ्या गणेशोत्सव सणाच्या अनुषंगाने सर्व खाजगी बस वाहतुकदारांनी शासनाने निश्चित केलेल्या भाडेदरापेक्षा जास्त भाडे आकारू नये. तसेच क्षमतेपेक्षा जादा प्रवाशांची वाहतूक करू नये. शासनाच्या नियमांची अंमलबजावणी न करणाऱ्या वाहतुकदारांवर कडक कारवाई करण्यात येईल. तसेच प्रवाशांनी असे जादाचे भाडे आकारणाऱ्या बस मालकांविरुध्द पुरावानिशी लेखी स्वरूपात छायाचित्रासह उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या ई-मेल आयडी rto.46-mhmah.gov.in अथवा ९००४६७०१४ या कार्यालयाच्या व्हॉटसअप क्रमांकावर तक्रार दाखल करावी, जिल्हयातील प्रवाशी रिक्षांच्या मनमानी भाडे आकारणी बाबत प्रादेशिक परिवहन प्राधिकरणातर्फे तयार करण्यात आलेला भाडेदर तक्ता (मीटरप्रमाणे व शेअर रिक्षा) हा जिल्हयातील विविध रिक्षा थांब्यावर प्रदर्शित करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे त्या त्या संवर्गातील टप्पा वाहतुकीचे सद्यस्थितीचे भाडेदर विचारात घेवून खाजगी कंत्राटी परवाना वाहनाचे त्या संवर्गासाठी संपूर्ण बससाठी येणाऱ्या प्रति कि. मी. भाडेदराच्या ५० टक्के पेक्षा अधिक राहणार नाही असे कमाल भाडेदर शासन निर्णयानुसार निश्चित केले आहेत.

## सहाय्यक पोलीस निरीक्षकांना निरीक्षक पदावर मिळाली पदोन्नती

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम -२२ न नुसार पोलीस आस्थापना मंडळ अंतर्गत सहाय्यक पोलीस निरीक्षकांना त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांक पासून पोलीस निरीक्षक पदावर त्यांनी पदोन्नती करून त्यांना संबंधित जागांवर नेमणूक करण्यात आली आहे.

परीमंडळ १ व परीमंडळ २ अंतर्गत कार्यरत असलेले राकेश रामदास पगारे यांची मुंबई शहर, राजेंद्र शंकर जाधव यांची रायगड, विश्वास प्रकाश भिंगारदिवे यांची नवी मुंबई विमानतळ, प्रभाकर केशवराव शीऊरकर, सुषमा छबुराव पाटील यांची नवी मुंबई विमानतळ, मोनाली प्रमोद चौधरी यांची नवी मुंबई विमानतळ, शमी गणेश रानवडे यांची नवी मुंबई विमानतळ, बाबासाहेब जगनाथ पवार यांची गुन्हे अन्वेषण विभाग पुणे, महेश ईश्वर जानकर यांची नवी मुंबई विमानतळ, प्रवीण मोहन कदम यांची नवी मुंबई विमानतळ, दीपक अंबाजी कदम यांची नवी मुंबई विमानतळ, प्रकाश अर्जुन पवार यांची एएनटीएफ, धनराज रवींद्र प्रभाळे यांची नवी मुंबई विमानतळ, अरुण माणिक पढार यांची नवी मुंबई विमानतळ, अशोक चंद्रभान डमाळे यांची नवी मुंबई विमानतळ, दीपक जया गावित यांची नवी मुंबई विमानतळ, कृष्ण अण्णा धामापूरकर यांची नवी मुंबई विमानतळ, संतोष राजू चव्हाण यांची नवी मुंबई विमानतळ, संजय भगवानदास सादिगळे यांची नवी मुंबई विमानतळ, राजू देवबा आलदर यांची मुंबई शहर, प्रदीप दिनकर दुपटे यांची मुंबई शहर, विजय शंकर चव्हाण यांची लाप्रवी आदींना बढत्या पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई रश्मी शुक्ल यांच्या आदेशाने देण्यात आल्या आहेत.

पान १ वरुन

## रायगड जि.प., पं.स. निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना अधिसूचना जाहीर

पनवेल तालुक्यात जिल्हा परिषदेचे सर्वाधिक आठ गट (मतदारसंघ) आहेत. अलिबाग तालुक्यात सात, कर्जत सहा, पेण व महाडमध्ये प्रत्येकी पाच, खालापूर, रोहा, उरण, माणगाव प्रत्येकी चार, तर सुधागड, मुरूड, तळा, म्हसळा, पोलादपूर व श्रीवर्धनमध्ये प्रत्येकी दोन अशी मतदारासंघ विभागणी करण्यात आली आहे.

**जि.प.चे तालुकानिहाय गट (मतदारसंघ)**

*पनवेल : वावंजे, नेरे, पाली देवद, पळस्पे, वावेघर, वडघर, गव्हाण, केळवणे; कर्जत : कळंब, कशेळे, माणगाव तर्फे वरेडी, नेरळ, कडाव, मोठे वेणगाव; खालापूर : चौक, वासांबे, सावरोली, आत्करगाव; सुधागड : जांभूळपाडा, राबगाव; पेण : जिते, दादर, वडखळ, महालमिऱ्या डोंगर, शिहू; उरण : नवघर, चाणजे, जासई, चिरनेर; अलिबाग : शहापूर, आंबेपूर, आवास, थळ, चेंढरे, चौल, कावीर; मुरूड : कोर्लई, राजपुरी; रोहा : नागोठणे, आंबेवाडी, भुवनेश्वर, घोसाळे; तळा : चरई खुर्द, रहाटाड; माणगाव : निजामपूर, तळाशेत, मोर्बा, गोरेगाव; म्हसळा : पाभरे, पांगळोली; श्रीवर्धन : बोर्लीपंचतन, आराठी; महाड : बिरवाडी, खरवली, दासगाव, करंजाडी, नडगाव तर्फे बिरवाडी; पोलादपूर : कापडे बुद्रुक, लोहारे.*

## विमानतळ नोकरीच्या नावाखाली खोट्या जाहिराती

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन ऑक्टोबरमध्ये होणार असल्याने रोजगाराच्या नावाखाली खोट्या जाहिरातींचा बाजार नवी मुंबई व पनवेलमध्ये सुरू आहे. विमानतळात नोकरी लावतो, प्रशिक्षण मिळवून देतो, असे दावे करून उमेदवारांची फसवणूक होत आहे. यामुळे रोजगाराच्या आशेने धावणाऱ्या तरुणांनी सावधान राहावे, असे आवाहन संबंधित अधिकृत कंपन्यांना करावे लागत आहे.

विमानतळाचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटनाची तयारी सुरू असून अदानी समूह आणि सिडको यंत्रणा काम करत आहेत. प्रकल्पग्रस्तांना सेवा क्षेत्रात प्राधान्याने रोजगार मिळावा, यासाठी प्रकल्पग्रस्त २७ गाव समितीसह लोकप्रतिनिधींनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. अदानी समूहाने सध्या विमानतळाच्या स्वच्छता व सुविधा विभागासाठी बीव्हीजी कंपनीची नियुक्ती केली आहे. या कंपनीमार्फतच प्रशिक्षण आणि रोजगाराची निवड होणार आहे. उमेदवारांनी खोट्या जाहिरातींचा बळी पडू नये.

## सिडको घराचा मोह दाखवून महिलेची लूट

**पनवेल : वार्ताहर**

सिडकोच्या घरांच्या मोहामुळे एका ४१ वर्षीय महिलेची तब्बल साडेतीन लाखांची फसवणूक झाली आहे. सिडको अधिकारी असल्याचे भासवत राखीव कोट्यातून घर मिळवून देण्याचे आश्वासन देत एका व्यक्तीने ही लाखोंची लूट केली आहे.

गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात पनवेल करंजाडे येथील आरोपीने स्वतःला सिडको अधिकारी असल्याचे भासवून मुंबईच्या ट्रॉम्बे परिसरात राहणाऱ्या महिलेची ओळख काढली. या महिलेचा विश्वास संपादन करत त्याने तिला रोडपाली येथील हंसध्वनी सोसायटीत नेले आणि येथील एक घर दाखवत घर मिळवून देतो असे आमिष दाखवले. यावर विश्वास ठेवून पीडित महिलेने त्या व्यक्तीच्या बँक खात्यात तब्बल ३ लाख ५५ हजार रुपये वर्ग केले.

अनेक महिने उलटूनही घर न मिळाल्याने महिलेला फसवणुक केल्याचा संशय आला. याप्रकरणी तिने कळंबोली पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्याच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा पोलिसांनी दाखल केला आहे.

## टीओडी मीटर ग्राहकांना मिळाली एक कोटी दोन लाखांची सवलत

**मुंबई : प्रतिनिधी**

सध्या राज्यामध्ये स्मार्ट टीओडी मीटर लावण्यात येत आहे. हे टीओडी मीटर, एक आधुनिक व स्मार्ट वीज मीटर आहे जे ग्राहकांना रियल टाईम मध्ये वीज वापराची माहिती देते. टीओडी मीटर ग्राहकांना वीज वापरात पारदर्शकता आणते. टीओडी मीटरचे अनेक फायदे आहेत.

याचा एक विशेष फायदा असा आहे की जे घरगुती ग्राहक सकाळी ९ वाजे पासून ते सायंकाळी ५ वाजेच्या दरम्यान वीज वापर करतात अशा ग्राहकांना ८० पैसे प्रति युनिट सवलत मिळते. महावितरणच्या भांडुप परिमंडलात जुलै महिन्यात १ लाख ४६ हजार २४४ वीज ग्राहकांनी या विशिष्ट वेळेत वीजवापर करून रु. २१ लाख ४६ हजार इतकी सवलत घेतली आहे. त्याचप्रमाणे ऑगस्ट महिन्यात या ग्राहकांची संख्या वाढून आज पर्यंत २ लाख ३७ हजार वीज ग्राहकांनी ८० लाख ७१ हजार रुपयांची सवलत घेतली आहे. टीओडी मीटर मुळे ग्राहकांना अचूक बिलिंग मिळते व रियल टाईम मध्ये वीज वापराबाबत माहिती मिळते. ज्यामुळे ग्राहक वीजवापर करण्याचे चोख नियोजन करून वीजबिलात बचत करू शकतात.

महावितरणच्या भांडुप परिमंडलात टीओडी मीटर वापर करून वीजबिलात सवलत घेणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. जुलै महिन्यात पेण मंडळातील ४६,४५८ ग्राहकांनी ३ लाख ५७ हजार रुपयांची टीओडी सवलत घेतली, ठाणे मंडळात ४०,१८७ ग्राहकांनी ७ लाख ६२ हजार इतकी टीओडी सवलत घेतली तर वाशी मंडळातील ५९,५९९ ग्राहकांनी १० लाख २७ हजार एवडी टीओडी सवलत घेतली. ऑगस्ट २०२५ पेण मंडळातील ८६,४९२ ग्राहकांनी १६ लाख १२ हजार रुपयांची सवलत घेतली तर ठाणे मंडळातील ७५,६२८ ग्राहकांनी ३४ लाख ०३ हजार व वाशी मंडळातील ७४,८८६ ग्राहकांनी ३० लाख ५६ हजार अशी एकूण २ लाख ३७ हजार ग्राहकांनी ८० लाख ७१ हजार रुपयांची सवलत घेतली आहे.

या प्रकारे एकाच महिन्यात टीओडी मीटर वापरणाऱ्या ग्राहकांच्या संख्येमध्ये सरासरी ९१ हजार एवढी वाढ झाली असून भांडुप परिमंडलात माहे जुलै व ऑगस्ट मिळून ३ लाख ८३ हजार २५० ग्राहकांनी १ कोटी २ लाख रुपयांची टीओडी सवलत मिळवली आहे. मुख्य अभियंता, भांडुप परिमंडल, श्री. संजय पाटील यांनी टीओडी मीटर लावून त्याचा लाभ मिळवावा असे आवाहन वीज ग्राहकांना केले आहे.



**खांदा कॉलनी : आनंदी ग्रुपचे सदस्य रघुनाथ रामा सावंत हे ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. याबद्दल आनंदी ग्रुप, मॉर्निंग योगा ग्रुप, अलर्ट सिटीझन फोरम, संजय भोपी सोशल क्लब व केबीसी यांच्या संयुक्त विद्यमाने पुढील वाटचालीसाठी सावंत यांना शुभेच्छा देण्यात आल्या.**

# पनवेल महानगरपालिका तुमच्या दारी!

## दीडशे डेंटल क्लिनिकना परवाने



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका व डेंटल वेलफेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आज दिनांक २२ऑगस्ट रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन येथे एका छताखाली सर्व सुविधा उपलब्ध करून डेंटल क्लिनिकांना परवाने देण्यात आले. यावेळी सुमारे १५० डेंटल क्लिनिकांना परवाने देण्यात आले.

उपायुक्त रविकिरण घोडके यांच्या सूचनेनुसार हे परवाना शिबिर आयोजित करण्यात आले. यावेळी डेंटल वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. रूचा वाळिंबे, सचिव वैभव ठक्कर ,समन्वय गोपाल शितोळे, खजिनदार आशिष बांदेकर उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग समिती अ, ब ,क, ड या कार्यक्षेत्रातील सर्व डेंटल क्लिनिक आस्थापनाना व्यवसाय परवाना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नुसार सर्व आस्थापनांना व्यवसाय परवाना घेणे बंधनकारक आहे . महापालिकेच्यावतीने १५० दिवस कार्यक्रम राबविण्यात येत असून या अंतर्गत 'पनवेल महानगरपालिका तुमच्या दारी ' या उपक्रमांतर्गत या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

सर्व डेंटल क्लिनिक व्यवसाय धारकांना एका छताखाली सर्व सुविधा उपलब्ध करून त्यांना परवाना देण्याच्या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले. यामध्ये एकूण १५० डेंटल व्यवसाय क्लिनिक धारक यांचे अर्ज व आवश्यकतेनुसार कागदपत्र तात्काळ भरणा करून त्यांना त्वरित व्यवसाय व्यवसाय परवाना देण्यात आले.

## निवडक

### ट्रॉफीच्या दुकानात चोरी

**पनवेल :** शहरातील एका बंद ट्रॉफीच्या दुकानाचे शटर, कडी कोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने दुकानातील २ लाख रुपये रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे. शहरातील जुने रतन टॉकीज समोर असलेल्या ट्रॉफीचे दुकान बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने दुकानाचे शटर, कडी कोयंडा तोडून दुकानातील ड्रॉवर मध्ये ठेवलेले २ लाख रुपये रोख रक्कम चोरून नेल्याने याबाबतची तक्रार दीपक सोनटक्के यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली.

### 'त्या' ट्रेलर चालकाविरुद्ध गुन्हा

**पनवेल :** पनवेलजवळील बीएलआर समोरील रस्त्यावर ट्रेलर उभ्या प्रकरणी ट्रेलर चालकाविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इंद्रीश राजभर (वय २४) याने त्याच्या ताब्यातील ट्रेलर रस्त्याच्या मध्ये भागी उभा करून वाहतुकीस अडथळा होईल अश्या तहेने उभा केल्याने त्याच्या विरुद्ध बीएनएस कलम २८५ अन्वय कारवाई करण्यात आली आहे.

### डम्परच्या धडकेत पोलीस जखमी

**पनवेल :** डम्परने धडक दिल्यामुळे दुचाकीवरील पोलिस जखमी झाल्याची घटना घडली आहे . या प्रकरणी तळोजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.महावीर लुबाळ हे तळोजा फेस टू तेथे राहत असून ते शीळ डायघर पोलिस ठाणे येथे रात्रपाळी करून घरी दुचाकीवरून जात होते. मुंब्रा ते पनवेल मार्गावरील धानसर टोल नाक्याजवळील शुभम गोडाऊनच्या समोर आले असता पाठीमागून आलेल्या डम्परने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. त्या धडकेत ते खाली पडले आणि त्यांचे छातीला व पायाला दुखापत झाली.

### श्री हरीविजय ग्रंथाची सांगता

**पनवेल :** नवीन पनवेलच्या विठ्ठल रुक्मिणी चॅरिटेबल ट्रस्टच्या मंदिरात श्री हरीविजय ग्रंथाची वाचन सांगता नुकतीच करण्यात आली. श्रावण महिन्याच्या प्रतिपदेला या ग्रंथ वाचनाची सुरुवात करण्यात आली होती. गुरुपुष्य अमृताचा मुहूर्त साधत या ग्रंथाची कीर्तनकार हभप सुरेश पाटील यांनी वाचन सांगता केली. ट्रस्टच्या वतीने गेली २९ वर्षे अखंडित हे कार्य सुरु असल्याचे या वेळी ट्रस्टचे अध्यक्ष भाऊ पाटील यांनी सांगितले. श्री विठ्ठल रुक्मिणी चॅरिटेबल ट्रस्टचे उपाध्यक्ष विजय म्हात्रे, खजिनदार विजय पाटील, सचिव दिलीप अनुभुले, कार्याध्यक्ष सुरेश फडके, उद्योजक रवी जोशी आदींसह वारकरी संप्रदायातील महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पनवेलमध्ये आज मयूखा महोत्सव

## ◆ शास्त्रीय नृत्याचा अद्वितीय सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नृत्यार्पणा फाईन आर्ट्स सेंटरच्या वतीने समृद्ध नृत्य वारशाच्या जतन व प्रसारासाठी समर्पित असलेला मयूखा महोत्सव शनिवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ०६ वाजता पनवेल शहरातील विरुपाक्ष मंगल कार्यालय येथे होणार आहे. विशेष म्हणजे परंपरा आणि कलात्मकतेचा संगम असलेला हा कार्यक्रम रसिकांसाठी विनाशुल्क असणार आहे.

या महोत्सवात नालंदा बानीतील मोहिनीयट्टम ख्यातनाम वादकांचा थेट वाद्यमेळ पनवेल व परिसरातील कला-रसिकांसाठी एक सांस्कृतिक मेजवानी असणार आहे. या महोत्सवाला प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते व मयूखा




प्रायोजक परेश ठाकूर, नॅशनल टेलिफोन ॲडव्हायजरी कमिटी सदस्य श्री. रमेश, विशेष पाहुणे म्हणून नालंदा नृत्यकला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उमा रेले, मोहिनीअट्टम नृत्यांगना व संस्थापिका निदेशिका डॉ. डिंपल नायर तर सेलिब्रिटी पाहुणे म्हणून मल्याळम अभिनेत्री व शास्त्रीय नृत्यांगना देवी चंदना, मराठी अभिनेत्री व शास्त्रीय नृत्यांगना तन्वी पळव आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

पद्मभूषण डॉ. कनक रेले यांच्या शिष्या व नालंदा नृत्यकला महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी नयना प्रकाश यांच्या संकल्पना व दिग्दर्शनाखाली हा उत्सव आयोजित होत आहे. मयूखाचा उद्देश कलाकार, रसिक आणि सांस्कृतिक प्रेमींना एका व्यासपीठावर आणणे हा आहे. या वर्षीच्या उद्घाटन कार्यक्रमात नालंदा बानीतील मोहिनीयट्टमचे मनमोहक सोलो सादरीकरण होणार असून, ते कलाश्री कलामंदलम सी. गोपाळकृष्णन यांच्या मार्गदर्शनाखाली नाट्यकलामंदिरम् सेंटर फॉर आर्ट्समार्फत सादर केले जाणार आहे. सादरीकरणासोबत थेट वाद्यमेळाचा संगत असणार आहे, त्यामुळे प्रेक्षकांना एक अद्वितीय सांस्कृतिक अनुभव मिळणार आहे. मयूखा हे असे व्यासपीठ आहे जे केवळ शास्त्रीय नृत्यप्रकारांची गहनता आणि सौंदर्य प्रदर्शित करत नाही, तर पुढील पिढीतील कलाकारांना प्रोत्साहन देते. नृत्यार्पणा फाईन आर्ट्स सेंटर या उपक्रमाद्वारे तरुण नर्तकांना प्रेरणा देण्याचे आणि प्रेक्षकांना भारताच्या पारंपरिक कलांचा खरा आस्वाद देण्याचे उद्दिष्ट ठेवते.

परफॉर्मिंग आर्ट्समधील पदव्युत्तर शिक्षण आणि मोहिनीयट्टमसाठीच्या अनेक वर्षांच्या समर्पणामुळे, नयना प्रकाश यांनी अनेक प्रतिष्ठित मंचांवर सादरीकरणे केली आहेत. त्यांच्या सादरीकरणात लास्य (कोमलता) आणि रौद्रम (तेज) यांचा सुंदर समन्वय दिसून येतो, ज्यामुळे प्रत्येक नृत्यप्रयोग दृश्य व भावनिक दृष्ट्या अद्वितीय ठरतो. परंपरा आणि कलात्मकतेचा संगम असलेला हा कार्यक्रम रसिकांसाठी एक पर्वणी आहे.

# गणेशोत्सवाच्या अनुषंगाने पोलिसांकडून बैठक

**पनवेल : वार्ताहर**

आगामी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने पनवेल शहर व पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील महामार्गालगत असलेल्या हॉटेल, चालक-मालक यांची बैठक सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग भाऊसाहेब ढोले यांच्या अध्यक्षतेखाली मंथन हॉल येथे घेण्यात आली

या बैठकीला मार्गदर्शन करताना सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग भाऊसाहेब ढोले यांनी सांगितले की, आगामी गणेश उत्सव दरम्यान कोकणाकडे जाणाऱ्या भाविकांची मोठ्या प्रमाणे वर्दळ असल्याने वाहतूक कोंडी होणार नाही. या करीता ढाबा, हॉटेल, दुकान समोरील रोडवर वाहन पार्किंग होणार नाही याची दक्षता घेणे, पार्किंग तसेच हॉटेल परिसरात चांगल्या प्रतीचे सीसीटीव्ही कॅमेरा लावणे,



वाहने अस्ताव्यस्त पार्क होणार नाही याकरिता जास्तीत जास्त सुरक्षारक्षक नेमणे, वाहतूक नियमनाकरिता आवश्यक ती पोलिस प्रशासनास मदत करणे, पार्किंग नियोजनासाठी पीए सिस्टीमचा वापर करणे, कोणीही मद्य विक्री करणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

या बैठकीला पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे, तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि गजानन घाडगे यांच्यासह ३५ ते ४० हॉटेल, ढाबा चालक-मालक उपस्थित होते.

# आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धा

## कळंबोली शाळा फेरीचा पारितोषिक वितरण सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोशिश फाउंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धा २०२५ अंतर्गत सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शाळा अंतर्गत फेरीचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या स्पर्धेतून निवड झालेले एकूण नऊ विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे देण्यात आली. हे विद्यार्थी आता आंतरशालेय फेरीसाठी पात्र ठरले आहेत.



या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, माजी नगरसेविका मोनिका महानवर, जिल्हा उपाध्यक्ष तथा स्पर्धा प्रमुख मयुरेश नेतकर, अशोक मोटे, केशव यादव, सुनीता हिरवळे, सुनील डेंबरे, राजेश पांडे, भाजयुमो कळंबोली शहर अध्यक्ष गौरव नाईक, दिलीप बिष्ट आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर प्रभावी मांडणी करून आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व कौशल्याचा विकास, आत्मविश्वास वृद्धी तसेच समाजघडणीसाठी वक्तृत्वाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी ही स्पर्धा उपयुक्त ठरली.

यावेळी गौरव नाईक यांनी म्हंटले कि, विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यासाठी आणि त्यांच्या विचारांना योग्य दिशा देण्यासाठी या स्पर्धेने उत्तम संधी उपलब्ध करून दिली आहे. वक्तृत्व ही केवळ कला नसून समाजाशी जोडणारे सामर्थ्य आहे. 'कोशिश फाउंडेशन'च्या सहकार्यामुळे आमच्या विद्यार्थ्यांना आंतर शालेय स्तरावर चमक दाखवण्याची संधी मिळत आहे, ही अभिमानाची बाब आहे.

# आई-वडील, आजी-आजोबांना विसरू नका

## जे.एम. म्हात्रे यांचे आवाहन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दहावी-बारावीला ९५ ते ९९ टक्के गुण मिळवणारे विद्यार्थी आपल्याकडे आहेत. या हुशार विद्यार्थ्यांनी परदेशी नोकरी करण्यापेक्षा भारतातच नोकरी किंवा धंदा करावा. भारतातही खूप चांगल्या संधी त्यांच्यासाठी उपलब्ध आहेत, पण हे सर्व करताना आपल्या आई-वडिलांचा आणि आजी-आजोबांचा विसर पडू देऊ नका, असे आवाहन माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले.

पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.

कार्यक्रमास संघाचे अध्यक्ष जयवंत गुर्जर, उपाध्यक्ष माधुरी गोसावी, सेक्रेटरी सुनील खेडेकर व अन्य मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश माणिक यांनी केले.

या कार्यक्रमात दहावी-बारावी तसेच इंजीनियरिंग व अन्य शाखांमध्ये उत्कृष्ट गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आला.



# गणेशोत्सवात आरती, भजनाला लागणारी ढोलकी बाजारात दाखल



**पनवेल : वार्ताहर**

गणेशोत्सवात आरती, भजनाला लागणारी ढोलकी बाजारात दाखल झाली आहे. शहाराच्या सुरुवातीलाच ठिकठिकाणी ढोलकी विक्रेत्यांनी दुकाने थाटली आहेत. त्यामुळे बाजारात ढोलकीचा नाद

निनादू लागला आहे. ढोलकी तयार करण्यासाठी लागणाऱ्या साहित्यांच्या किंमतीमध्ये वाढ झाल्याने यंदा ढोलकीची किंमत १५ टक्क्यांनी वाढ झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. गणरायाचे आगमन २७ ऑगस्टपासून घरोघरी होणार आहे. पनवेल परिसरात ३० हजारा हून अधिक ठिकाणी गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. काही ठिकाणी दीड दिवसाचे , पाच दिवसांचे, दहा दिवसांचे गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. यापार्श्वभूमीवर पनवेल परिसरातील बाजारात गेल्या काही दिवसांपासून ढोलकी विक्रेत्यांनी आपली दुकाने ठिकठिकाणी थाटली आहेत. मुंबई, ठाणेसह राजस्थान येथून सहकुटुंब ढोलकी विक्रेते दाखल झाले आहेत. लहान ढोलक्यांपासून मोठ्या आकाराच्या ढोलक्या तसेच जंबे तयार करण्यापासून त्या विक्रीला ठेवण्यात आल्या आहेत.

पुठ्यांसह फणस, आंबा, शिसव आदी लाकडांपासून तयार केलेल्या ढोलक्या बाजारात उपलब्ध झाल्याचे पहावयास मिळत आहे. वेगवेगळ्या आकाराच्या ढोलक्या रु १५०० रुपयांपासून चार हजारांपर्यंत बाजारात विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत. वाढत्या महागाईमुळे ढोलकी तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची किंमत १५ टक्क्यांनी वाढली आहे. ढोलकीच्या किमतीमध्ये ५०० ते १००० रुपयांपर्यंत, तर पुठ्यांच्या ढोलकीच्या किमतीमध्ये १०० रुपयांनी वाढ झाली आहे. त्यामुळे यंदा ढोलकीच्या किमतीत १५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. त्यात वेगवेगळ्या आकाराचे जंबे २ हजार ५०० ते ५००० रुपये किंमत आहे.




## संपादकीय

# कायद्याची वेसण योग्यच

आर्थिक ऑनलाइन गेम हे आपल्या समाजासाठी विशेषत: मध्यमवर्गीय तरुणांसाठी मोठी समस्या बनत चालल्याचे स्पष्ट दिसत होते. या गेमच्या व्यसनापायी अनेक कफल्लक झाले तर कित्येकांनी त्यापायी आत्महत्याही केल्या. त्यामुळे या जुगारावर बंदी घातली जाते आहे हे लाखो कुटुंबांना दिलासा देणारे आहे.

**ऑनलाइन मनी गेम्स व ऑनलाइन जुगारांसारख्या घातक प्रकाराला वेसण घालणारे ‘ऑनलाइन गेमिंग- प्रोत्साहन आणि नियमन२०२५’ हे विधेयक बुधवारी लोकसभेत मंजूर करण्यात आले तर राज्यसभेने त्याला गुरुवारी मंजुरी दिली. पैसे भरणे, पैसे जिंकणे किंवा बोली लावणे यांसारखे प्रकार असलेल्या सर्व ऑनलाइन गेमवर आता कायद्याने बंदी येणार आहे. झटपट पैसा कमावण्याच्या हव्यासातून अलीकडच्या काळात सर्व वयोगटांमध्ये व विशेषत: तरुणांमध्ये ऑनलाइन मनी गेम्स अतिशय लोकप्रिय झाले होते. सर्व स्तरांतील नागरिकांच्या हातात स्मार्टफोन आल्यामुळे गेमिंगचे वेड देशभरात पसरले. मनी गेम्सपायी अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत असल्याने या स्वरुपाच्या ऑनलाइन गेमिंगवर प्रतिबंध आणणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे. देशातील कोट्यवधी तरुणांनी त्यावर कोट्यवधी रूपये गमावले आहेत. एका सरकारी अंदाजानुसार दरवर्षी सुमारे ४५ कोटी नागरिक ऑनलाइन रिअल मनी गेमिंगमध्ये एकूण २० हजार कोटी रूपयांपेक्षा अधिक पैसे गमावतात. यातून आत्महत्या केल्याचीही अनेक प्रकरणे समोर आली आहेत. बुधवारी लोकसभेत मांडलेल्या यासंदर्भातील विधेयकामुळे ऑनलाइन जुगार चालवणाऱ्या गेमवर बंदी घालणे शक्य होणार आहे. ई-स्पोर्ट्स आणि ऑनलाइन सोशल गेम्सना प्रोत्साहन देणे मात्र ऑनलाइन मनी गेम्स व त्याच्याशी संबंधित सेवा, जाहिराती आणि आर्थिक व्यवहारांवर पूर्णपणे बंदी घालणे हे या विधेयकाचे उद्दिष्ट आहे. आताच या संदर्भातील सुस्पष्ट नियमावली तयार नसली तरी सरकारकडून निर्माण केले जाणारे प्राधिकरण या क्षेत्राचे नियामक असेल. या विधेयकाद्वारे ऑनलाइन मनी गेम खेळणाऱ्यांना कोणतीही शिक्षा केली जाणार नाही. परंतु अशा गेम्सची सेवा पुरवणारे , जाहिरातदार आणि संबंधित व्यवहारांतील सहयोगी यांच्यावर मात्र कारवाई होईल. ऑनलाइन गेम चालवणाऱ्यांना या कायद्याअंतर्गत तीन वर्षांपर्यंत कैद किंवा एक कोटी रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. अशा गेमची जाहिरात करणाऱ्यांना दोन वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा ५० लाख रूपयांपर्यंत दंड होऊ शकतो. या क्षेत्रात सुमारे ४०० स्टार्टअप्स कार्यरत असून त्याद्वारे लाखोंना रोजगारही मिळाल्याचे सांगितले जाते. या साऱ्यांचे काय हा प्रश्न आहेच. अब्जावधी रुपयांची उलाढाल होणाऱ्या या क्षेत्रातून सरकारला गेल्या वर्षी सुमारे २० हजार कोटी रुपयांचा महसूल मिळाला होता. तरीही सरकारने महसूल बुडण्याची चिंता न करता या गेमवर बंदी घालण्याचे पाऊल उचलले आहे. समाजाच्या हिताशी मोदी सरकारने कधीही तडजोड केलेली नाही. समाज आणि सरकारी महसूल यांपैकी एकाची निवड करण्याचा प्रश्न येतो तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमीच समाजाला प्राधान्य देतात असे केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि महिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी हे विधेयक मांडताना आवर्जून नमूद केले. प्रस्तावित कायदा ई-स्पोर्ट्सना कायदेशीर मान्यता आणि प्रोत्साहन देईल तर ऑनलाइन जुगार आणि मनी गेममुळे होणाऱ्या गंभीर नुकसानापासून समाजाचे रक्षण करेल याची खात्री सरकारला वाटते. हजारो नागरिकांना आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त करणाऱ्या ऑनलाइन जुगाराला कायद्याने वेसण घातली जाणे स्वागतार्हच आहे.**

# मराठी ग्रंथकार डॉ. शंकर दामोदर पेंडसे

मराठी ग्रंथकार आणि संतसाहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. शंकर दामोदर पेंडसे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील खेड या गावी २८ फेब्रुवारी १८९७ रोजी झाला. १९०८ साली लोकमान्य टिळकांना शिक्षा झाली, त्या वेळी पेंडसे वाशिम येथील शाळेत शिकत होते. या शिक्षेच्या निषेधार्थ ते शाळेत अनुपस्थित राहिले आणि एका जाहीर सभेत त्यांनी भाषणही केले. या कृत्याबद्दल सरकारी हुकुमाने त्यांना शाळेतून काढून टाकण्यात आले. त्यानंतर त्यांनी सरकारी शिक्षणसंस्थांकडे पाठ फिरवून तत्कालीन पाठशाळांतून आपले शिक्षण चालू ठेविले. त्यासाठी जळगाव, अमळनेर, काशी, कलकत्ता, दिल्ली, लाहोर इ. ठिकाणी जाऊन तत्त्वज्ञान आणि प्राच्यविद्या यांचे सखोल अध्ययन त्यांनी केले,

कलकत्त्यास ‘वेदान्ततीर्थ’ ही पदवी त्यांनी मिळविली (१९२०). दिल्लीच्या हिंदू कॉलेजातून ते बीए झाले (१९२३). लाहोरच्या सनातन धर्म कॉलेजातून एम.ए. आणि एमओएल (मास्टर ऑफ ओरिएंटल लर्निंग) या संस्कृत व प्राच्यविद्या विषयांतील सर्वोच्च पदव्या त्यांनी मिळविल्या. त्यानंतर १९२५ साली लोकमान्य टिळकांचे भाचे धोंडोपंत विद्वांस यांच्या कन्या चंद्राताई यांच्याशी पेंडसे यांचा विवाह झाला. १९२७ मध्ये नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजात मराठीचे प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. पेंडसे ह्यांच्या पदव्या संस्कृतच्या असूनही त्यांचा मराठीतील लेखनाचा लौकिक लक्षात घेऊन ही नेमणूक करण्यात आली. पुढे १९३०मध्ये नागपूर विद्यापीठाची एमए परीक्षा मराठी हा विषय घेऊन ते प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले व त्या वर्षीचे मराठीचे ना.के. बेहेरे सुवर्णपदक मिळविण्याचा मानही त्यांनी मिळवला. श्री ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान हा प्रबंध लिहून त्यांनी १९३९मध्ये नागपूर विद्यापीठाची पीएचडी मिळविली. निवृत्त होईपर्यंत त्यांनी हिस्लॉप कॉलेजमध्येच मराठीचे प्रमुख म्हणून काम केले.



संस्कृत साहित्याचा आणि मराठी संतसाहित्याचा त्यांचा व्यासंग मोठा असल्याने त्यांचे बहुतेक लेखन याच विषयाशी संबंधित आहे. महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास (१९३१) या ग्रंथात त्यांनी ऋग्वेद-काळापासून रामदासकाळापर्यंतच्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विकासाचे चित्र रेखाटले आहे. श्री ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान (१९४१) या आपल्या प्रबंधात त्यांनी संस्कृतातील गीता-भाष्यांशी ज्ञानेश्वरीची तुलना करून ‘भाष्यकाराते वाट पुसतु’ या ज्ञानेश्वरांच्या वचनातील भाष्यकार शंकराचार्य हेच होत, असा सिद्धांत प्रतिपादन केला आहे. ज्ञानेश्वरीचा अभ्यास (१९५४), मराठी संत-काव्य आणि कर्मयोग (१९६१), ज्ञानदेव-नामदेव (१९६९), भागवतोत्तम संत एकनाथ (१९७१), साक्षात्कारी संत तुकाराम (१९७२), राजगुरू समर्थ रामदास (१९७४) या त्यांनी लिहिलेल्या संतवाङ्म यविवेचक ग्रंथांतूनही त्यांची विद्वत्ता, त्यांचा व्यासंग आणि त्यांची रसिकता यांचे दर्शन घडते.

विशेषत: महाराष्ट्रातील ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि रामदास या पाच संतकवींच्या कार्याचे आपल्या विद्वात्तापूर्ण ग्रंथांमधून त्यांनी केलेले विवेचन आणि मूल्यमापन अतिशय मूलगामी झालेले आहे. वैदिक वाङ्मयातील भागवत धर्माचा विकास (१९६५) या ग्रंथात त्यांनी भागवत धर्म हे मूळच्या सूर्योपासनेचे विकसित रूप होय, हे साधार प्रस्थापित केले आहे. याच विषयाच्या अनुषंगाने त्यांनी लिहिलेले पौराणिक भागवत धर्म (१९६७) हे पुस्तक उल्लेखनीय आहे. याशिवाय त्यांचे स्फुट लेखनही बरेच आहे. त्यात ‘कर्मयोग की कर्मसंन्यास’, ‘टिळकांची धर्मविषयक मते’, ‘शिवकालीन संस्कृती व धर्म’, ‘मराठी राजकारणाचा आत्मा’, ‘विद्यापीठे व मातृभाषा’ इ. लेखांचा समावेश होतो. यांशिवाय राजगुरु समर्थ रामदास व त्यांचे आक्षेपक व श्री ज्ञानेश आणि शैवागम यांसारख्या लेखमालांचाही उल्लेख अवश्य करावयास हवा. या दोन्ही लेखमाला नंतर पुस्तकरूपाने प्रकाशित झाल्या आहेत.

१९५३मध्ये मोझरी येथे भरलेल्या साहित्यसंमेलनाचे ते अध्यक्ष होते व १९५५मध्ये पंढरपूर येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. पुणे येथे त्यांचे २३ ऑगस्ट, १९७४ रोजी निधन झाले.

**-म.ना. अदवंत**

# *ओढा अंगणातला आणि मनातला..!*



पावसाच्या धुवांधार सरींनी घराच्या अंगणातला ओढा खळखळून वाहतोय. नजर टाकावी तिथे फक्त हिरव्या रंगाच्या छटा. प्रत्येक झाडाच्या पानांचा रंग हिरवाच, पण त्यातही वेगळेपणा. किमयगाराची एक अलौकिक निर्मिती, तर एकीकडे डोंगरावर उतरणारे शुभ्र ढगांच्या थव्यांचं विलोभनीय दृश्य पाहताना स्वप्नातच असल्याचा भास होतो. पावसाळ्याचे चार महिने म्हणजे पर्वणीच.

या सर्वामध्ये लक्ष वेधतो,तो अंगणातला ओढा, कारण नुसता पाण्याने भरलेला ओढा नाही तर डोंगरावरचं पावसाचं पाणी समुद्रात पोहचवणारा वाहकच. असा ओढा ज्याला फक्त वाहणं ठाऊक असतं. त्याला निव्वळ देणं माहिती असतं.पाण्यासोबत येणारी माती, दगड सर्वच तो वाहून नेतो.

पाणी जेव्हा ओढ्याच्या पात्रात पडतं तेव्हा ते तिथे थांबत नाही, तर क्षणाचीही उसंत न घेता त्या पाण्याचा पुढच्या दिशेने प्रवास सुरू होतो. समुद्राच्या अथांगतेत मिसळून पुन्हा नव्यानं बरसण्यासाठी, तर या ओढ्याकडून काय शिकावं? कोणत्याही प्रसंगात, परिस्थितीत फक्त वाहणं. म्हणजेच काय तर कोणतीही अपेक्षा न करता भरभरून देणं. आकाशातून पडणारा पाण्याचा शुभ्र थेंब जणू अमृतच. या अमृताला बांधून ठेवण्याचा मोह त्या ओढ्याला होत नसेल का? तर नक्कीच होत असेल, मात्र त्याला ते माहिती आहे साठलेल्या पाण्याचं डबकं होतं आणि तिथे डास येतात याउलट वाहत्या पाण्यावर राजहंस येतात. त्यामुळे शुभ्र पाण्याचा मोह आवरून तो फक्त वाहतो. वाहताना तो पाण्यासोबत कचरासुद्धा वाहून नेतो, कारण त्याला माहिती आहे यातलं काहीच स्थिर नाही. परिवर्तन ही संसार का नियम हैया उक्तीप्रमाणे तो स्वतःजवळ काहीही कवटाळून ठेवत नाहीच, पण आजूबाजुच्या प्रदेशाला सुपीक करतो.

माझ्या अंगणातला ओढासुद्धा असाच आहे. तो मला माझ्या कल्पनेतल्या तुझ्यासारखा वाटतो. पावसाळ्याचे चारच महिने वाहतो उरलेले आठ महिने कोरडेच शुष्क प्रदेशासारखे.तरिही या चार महिन्यात तो भरभरून देतो. ओतप्रोत ओसंडतो. वाट पाहण्यात काय गंमत असते ती या ओढ्यामुळेच कळते. पावसाच्या सरींच्या वर्षावाने प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर अमृताचा अभिषेक होतो आणि ओढा खळखळू लागतो. रात्रीच्या निरव शांततेमध्ये ओढ्याचा खळखळणारा नाद हा कोणत्याही संगीतापेक्षा मधुर वाटतो.

माझ्या कल्पनेतला तूसुद्धा तसाच आहेस. महिनोन्महिने वाट पाहिल्यानंतर असाच कधीतरी अवतरतोस. एखाद्या अनपेक्षित क्षणी आणि दीर्घकाळ टिकेल असा आनंद देऊन जातोस, पण तू थांबत नाहीस तुला थांबविण्याचा मीही कधी प्रयत्न करत नाही, तसा प्रयत्न करणारही नाही, कारण वाहत्या पाण्यावरच राजहंस येतात तूसुद्धा मला राजहंसच वाटतोस. शुभ्र, रुबाबदार, देखणा पाण्यातल्या इतर पक्ष्यांपेक्षा निराळा तरीही मन मोहून टाकणारा.

आता हळूहळू भरलेली ओंजळ रिक्त होते. दोन हातांच्या चीरेतून पाणी हळूहळू सांडून जात निसटून जातात क्षणही तसेच पण, ओल मात्र कायम राहते. आता वाट पहायची पावसाची, रिमझिम, मुसळधार, रिपरिप, धो धो पावसानं ओढ्यानं पुन्हा एकदा तुडुंब भरून ओसंडण्याची, पुन्हा एकदा तुला ओंजळीत झेलण्यासाठी... नव्यानं माझीच मी गवसण्यासाठी!

**-ऋतुजा म्हात्रे-महामुनी**




## बँक खात्याशिवाय यूपीआय पेमेंट करा, जाणून घ्या..

फोनपेचे यूपीआय सर्कल फीचर तुमच्यासाठी खास ठरू शकते. हे फीचर युजर्सना एक प्रकारचे लूप म्हणजेच सर्कल तयार करण्यास आणि त्यांचे कुटुंब, मित्र किंवा विश्वासू लोकांच्या वतीने पेमेंट करण्यास अनुमती देते. या फीचरच्या मदतीने आता तुम्ही तुमच्या कुटुंबासाठी किंवा मित्रांसाठी कोठूनही पेमेंट मॅनेज करू शकाल.

विशेष म्हणजे डिपेंडंट मेंबर्स म्हणजेच कुटुंबातील सदस्य किंवा मित्र-मैत्रिणी बँक खात्याशिवायही आपला यूपीआय आयडी जनरेट करू शकतील. विशेषत: ज्यांचे स्वत:चे बँक खाते नाही किंवा जे ऑनलाइन बँकिंग वापरत नाहीत त्यांच्यासाठी फोनपेचे हे नवे फीचर खूप उपयुक्त ठरणार आहे. यूपीआय वापरणाऱ्या अशा युजर्सचे मित्र किंवा कुटुंबीय त्यांच्यासाठी पैसे देऊ शकतील.


यूपीआय सर्कल कसे कार्य करते?

फोनपेवरील यूपीआय सर्कल फीचरच्या मदतीने यूपीआय खातेधारक (प्रायमरी युजर्स) यूपीआय आयडी किंवा ठठ कोडचा वापर करून आपले कुटुंब/मित्र (सेकंडरी युजर्स) आपल्या सर्कलमध्ये जोडू शकतो आणि त्यांच्यासाठी कोठूनही सहजपणे पेमेंट करू शकतो. प्रायमरी युजर्सचे या सर्कलवर पूर्ण नियंत्रण असेल. म्हणजेच तो पेमेंट रिक्वेस्ट मंजूर किंवा नाकारू शकतो, सेकंडरी युजर्सच्या खर्चाचा मागोवा घेऊ शकतो, पेमेंट हिस्ट्री तपासू शकतो आणि कोणालाही कधीही सर्कलमधून काढून टाकू शकतो.

यूपीआय सर्कल कसे वापरावे?

हे फीचर वापरण्यासाठी सर्वप्रथम फोनपे ॲप ओपन करा. होम स्क्रीनवर खाली स्क्रोल करताना तुम्हाला यूपीआय सर्कलचा पर्याय दिसेल. आता यूपीआय सर्कलच्या पर्यायावर क्लिक केल्यानंतर तुम्ही सेकंडरी युजर्स म्हणजेच तुमचे जवळचे मित्र आणि कुटुंबीय तुमच्या अकाऊंटमध्ये ॲड करू शकता. सेकंडरी युजर्सला लिंक करण्यासाठी त्यांचा क्यूआर कोड स्कॅन करून किंवा मॅन्युअली यूपीआय आयडी टाकून ’इन्व्हाइट सेकंडरी कॉन्टॅक्ट’वर टॅप करा. सेकंडरी युजर्सना आता त्यांच्या फोनपे ॲपवर आलेले निमंत्रण स्वीकारावे लागेल, त्यानंतर ते यूपीआय सर्कलमध्ये सामील होतील. यूपीआय सर्कलमध्ये सामील झाल्यानंतर, दुय्यम युजर्स पेमेंट सुरू करण्यासाठी पेमेंट पर्याय म्हणून प्रायमरी युजर्सचे खाते निवडू शकतात.

# थोर साहित्यिक विंदा करंदीकर



निमित्त

कवी, साहित्यिक, भाषांतरकार, निबंधकार अशा विविधांगांनी वावरणारे गोविंद विनायक करंदीकर उर्फ विंदा करंदीकर यांची आज जयंती. भारतातील ज्ञानपीठ हा सर्वो च्च पुरस्कार मिळवणारे वि.स. खांडेकर आणि वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यानंतर विंदा मराठी साहित्यातील तिसरे साहित्यिक आहेत. भारतीय साहित्य क्षेत्रातील हा बहुमान खरंतर त्यांना केव्हाच मिळायला हवा होता, पण उशिराने का होईना त्यांचा योग्य तोच सन्मान झाल्याची प्रतिक्रिया साहित्य वर्तुळात उमटली.


विंदांचा जन्म २३ ऑगस्ट १९१८मध्ये सिंधुदुर्गमध्ये धालवली येथे झाला. ते कवी, लेखक, अनुवादक व समीक्षक होते. १९४९च्या मे महिन्यात विंदांच्या ‘स्वेदगंगा’ या कवितासंग्रहाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. ‘स्वेदगंगा’ या कवितासंग्रहात अंतर्भूत कवितांची सामाजिक आशयाची कविता, व्यक्तिचित्रणात्मक, प्रेमविषयक, बालजीवनविषयक, चिंतनात्मक, देवगड-राजापूरकडील बोलीभाषेतील कविता अशी वर्गवारी करता येऊ शकते. स्वेदगंगा कवितासंग्रहातून पुढील तीन कविता घेण्यात आल्या आहेत.

ज्येष्ठ विचारवंत एल. एम. सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली ज्ञानपीठ पुरस्कार निवड समितीची बैठक दिल्लीत पार पडली आणि लगेचच दुसऱ्या दिवशी याची अधिकृत घोषणा करण्यात आली. पाच लाख रुपये व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ‘रसिकांनी मला भरभरून प्रेम दिले. माझ्या दृष्टीने रसिकांचे प्रेम हाच खरा सन्मान आहे. पुरस्कार वगैरे उपचार असतात. हा पुरस्कार म्हणजे माझ्या एकट्याचा सन्मान नाही, तर मराठी भाषा, कविता आणि काव्य परंपरेचा हा सन्मान आहे,’ अशा शब्दांत विंदांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

काव्यवाचनाचा प्रकार फारसा रूढ नसतानाही वसंत बापट, मंगेश पाडगावकर आणि विंदा या तिघांनी काव्यवाचनाच्या जाहीर कार्यक्रमांचे अनेक फड रंगवले आहेत. १९४९ साली प्रथम प्रकाशित झालेल्या ‘स्वेदगंगा’ पासून सुरु झालेला विंदांचा साहित्यिक प्रवास ‘मृद्गंध’, ‘धृपद’, ‘जातक’, ‘विरूपिका’ आदी काव्यसंग्रह; ‘स्पर्शाची पालवी’ आणि ‘आकाशाचा अर्थ’ हे दोन लघुनिबंधसंग्रह; ज्ञानेश्वरांच्या ‘अमृतानुभवा’चा अर्वाचीनीकरणाचा अभिनव प्रयोग; ‘परंपरा आणि नवता’ हा मराठी समीक्षालेख संग्रह; फाऊस्ट, राजा लिअर आणि ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र आदी अनुवादीत ग्रंथ.

‘राणीचा बाग’, ‘एकदा काय झाले’, ‘सशाचे कान’, ‘एटू लोकांचा देश’, ‘पिशी मावशी आणि तिची भुतावळ’ हे काही बालकविता संग्रह. २००३ साली प्रकाशित झालेला ‘अष्टदर्शने’ या संग्रहापर्यंत येऊन पोहोचतो. ‘अष्टदर्शने’ या संग्रहात आठ तत्त्वज्ञांचे विचार त्यांनी सोप्या रचनांमध्ये मांडले आहेत. याच संग्रहाकरता त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला आहे. आशयगर्भित पण सोपी शब्दरचना करणारे विंदा आपल्या कवितांतून वैश्विक सत्य धुंडाळत राहिले. त्यांची कविता प्रयोगशील आहे. विंदांच्या काव्यात व्यक्तिगत भावजीवनापासून सामाजिक वास्तवापर्यंतचे व्यापक अनुभव पहायला मिळतात. विंदांना ललित पारितोषिक समितीचे क्रिटिक्स ॲवॉर्ड, सिनीयर फुलब्राईट, कबीर सन्मान, सोव्हिएत लँड नेहरू लिटररी ॲवॉर्ड, जनस्थान पुरस्कार तसेच साहित्य अकादमीची फेलोशिपही मिळाली. **(साभार : मराठीवर्ल्ड)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### निळा चहा प्यायलाय का? जाणून घ्या फायदे

बहुतेक लोक त्यांच्या सकाळची सुरुवात दुधाच्या चहाने करतात, कारण त्यांना माहित आहे की हा चहा आरोग्यासाठी तितका फायदेशीर नाही. दुधाचा चहा पिल्याने पोटात आम्लता आणि छातीत जळजळ यासारख्या समस्या देखील उद्भवू शकतात. त्याचवेळी हर्बल चहाच्या नावाखाली, लोक ग्रीन टी आणि आल्याच्या चहापुरते मर्यादित आहेत.



परंतु, एक चहा असा देखील आहे जो दिसायला सुंदर नाही तर पिण्यासही स्वादिष्ट आहे आणि अनेक आरोग्य फायदेदेखील देतो. ही चहा म्हणजे अपराजिता चहा. क्लिटोरिया टर्नेटिया म्हणजेच अपराजिता फ्लॉवरपासून बनवलेला हा निळा चहा एक नाही तर अनेक आरोग्य फायदे देतो.

शरीर स्वच्छ करण्यासाठी ही चहा प्यायली जाऊ शकते. ही चहा पिल्याने शरीर विषमुक्त होते. पोट स्वच्छ होते. ब्लू टी प्यायल्यानंतर लघवीचा प्रवाह सुधारतो, ज्यामुळे शरीरातील विषारी पदार्थ सहजपणे बाहेर पडतात. ब्लू चहा पिल्याने ताण कमी होऊ शकतो. यामुळे ताण कमी होतो, आळस आणि आळस येत नाही. कॅफिन नसतानाही अपराजिता चहा पिल्यानंतर व्यक्तीला सतर्कता जाणवते. अपराजिता फुलांचा चहा मेंदूला निरोगी ठेवतो. या चहाला मेंदूसाठी अमृत म्हणता येईल. त्यात अँटी-ऑक्सिडंट्स असतात जे या चहाला निळा रंग देतात. हे अँटी-ऑक्सिडंट्स मेंदूचे आरोग्य चांगले ठेवण्यास मदत करतात. ब्लू टी रक्तातील साखरेची पातळी संतुलित ठेवण्यास मदत करते.

हा प्यायल्याने रक्तातील साखरेची वाढ होत नाही. सकाळी रिकाम्या पोटी हे चहा घेतल्यास दिवसभर रक्तातील साखरेची पातळी सामान्य राहते. अपराजिता फुलांचा चहा डोळ्यांसाठी देखील खूप फायदेशीर आहे. हा चहा प्यायल्याने दृष्टी दीर्घकाळ टिकून राहण्यास मदत होते. त्यात असलेले संयुगे डोळ्यांमध्ये रक्तप्रवाह सुधारतात. दाहक-विरोधी गुणधर्मांनी समृद्ध असलेला ब्लू टी सांधेदुखी कमी करू शकतो. जर दररोज सकाळी तो प्यायला गेला तर शरीर वेदनांपासून मुक्त राहते.

अपराजिता फुलांच्या ५ ते ६ वाळलेल्या पाकळ्या एक ते दीड कप पाण्यात घालून ५ ते १० मिनिटे उकळवा. त्यात मध आणि थोडा लिंबाचा रस घाला आणि चाखल्यानंतर प्या. अपराजिता फुलांच्या चहामध्ये (अपराजिता के फूलों की चहा) साखर घालू नका. लक्षात ठेवा की कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईट असतो आणि म्हणूनच हा चहा मर्यादित प्रमाणात प्यावा आणि जास्त प्रमाणात सेवन टाळावे.

# गणेशमूर्तींचे माहेरघर पेणमधून ४५ हजार बाप्पांची परदेशवारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

आकर्षक रंगसंगती आणि देखणी मूर्ती हे पेणमधील गणेशमूर्तींचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे पेणच्या गणपतींच्या मूर्तींना केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशाविदेशातून मागणी होत असते. यंदा पेणमधून ४५ हजारहून अधिक गणेशमूर्ती परदेशात पाठवण्यात आल्या आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा जवळपास दुपटीने गणेशमूर्ती परदेशात पाठवण्यात आल्या आहेत. गेल्या वर्षी जवळपास २६ हजार गणेशमूर्ती परदेशात पाठवण्यात आल्या होत्या यावर्षी ४५ हजारहून अधिक गणेशमूर्ती परदेशात पाठवण्यात आल्या आहेत.



पेण तालुक्यात मध्ये गणपती बनवणाऱ्या ५०० लहान मोठ्या कार्यशाळा आहेत. यातून दरवर्षी साधारणपणे ३२ लाख गणेशमूर्ती बनवल्या जातात. देशाविदेशात देखील या गणेशमूर्तींची विक्री केली जाते. यातून जवळपास १०० कोटींची उलाढाल होत असते.

यावर्षी पेण मधून ४५ हजारहून अधिक गणेशमूर्ती विदेशात पाठवण्यात आल्या आहेत. यात प्रामुख्याने अमेरिका, इंग्लड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, मॉरिशियस, थायलॅण्ड, इंडोनेशिया आणि संयुक्त अरब अमिरात यासारख्या देशांचा समावेश आहे. मार्च महिन्यापासून या गणेशमूर्ती परदेशात टप्प्याटप्प्याने पाठवण्यात आल्या आहेत.

परदेशातून प्रामुख्याने अनिवासी भारतीय लोक ऑनलाईन पध्दतीने गणेशमूर्तींची अगाऊ नोंदणी करत असतात. त्यानूसार परदेशात या गणेशमूर्ती परदेशात पाठवल्या जातात. साधारणपणे पेणमधील कार्यशाळांमधून दहा इंचापासून सहा फुटांपर्यंतच्या गणेश मूर्ती परदेशात पाठवण्यात येतात. गणेशमूर्तींची मोडतोड होऊ नये यासाठी विशेष खबरदारी घेतली जाते. त्यानंतर जेएनपीटी बंदरातून कंटेनरमधून गणेशमूर्ती जगभरात पाठवल्या जातात. ४० फूट लांब कंटेनरमध्ये साधारण दीड हजार लहान गणेशमूर्तीं जातात. दोन ते सहा फूट गणेशमूर्तींचे पाचशे गणेशमूर्ती पाठवल्या जातात.

**जगभरात ज्या देशात अनिवासी भारतीय वास्तव्य करतात, त्या देशातून गणेशमूर्तींची मागणी केली जाते. मागणीनुसार मूर्तीकार या गणेशमूर्ती परदेशात पाठवत असतात.**

**–श्रीकांत देवधर, अध्यक्ष, पेण गणेश मूर्तीकार संघटना**

# गणेशमूर्तींचे रंगकाम अखेरच्या टप्प्यात!

## कारागीर कामात व्यस्त

**मुरुड : प्रतिनिधी**

मुसळधार पडणारा पाऊस आता शांत झाला असून आता उन्ह पडू लागल्याने गणपती कारखानदार यांना मोठा दिलासा प्राप्त झाला आहे.कारण काही मोजकेच दिवस शिल्लक असताना वातावरणात आर्द्रता राहिली असती तर गणपतीचे कलर काम करताना खूप मोठ्या समस्येस सामोरे जावे लागले असते.परंतु आता प्रस्थित हळू हळू सुधारत असून वातावरणात मोठा बद्दल होत असल्याने कारखानदार यांना मोठा दिलासा मिळत आहे.सर्व गणपती कारखान्यांमधून सुमारे ८० टक्के काम पूर्ण झाले असून सर्वच जण आता शेवटच्या तयारीस अथक परिश्रम घेताना दिसत आहेत.

मुरुड तालुक्यात वेगवेगळ्या भागात एकूण १४४ गणपती कारखाने आहेत २७ ऑगस्टला गणेशोत्सव उत्सव साजरा होणार असुन श्री गणेशाच्या मूर्ती बनवणाऱ्या चित्रशाळेमध्ये श्री गणेश मूर्तीवर रंगाचा शेवटचा हात फिरवण्यासाठी कारगिरांची लगबग सुरू आहे. वेगवेगळ्या आकाराच्या वेगवेगळ्या रंगांनी रंगवलेल्या श्री गणेशमूर्ती सध्या कारखान्यांमध्ये तयार होताना पहावयास मिळत आहेत.



महाराष्ट्रचा सांस्कृतिक सण म्हणून गणेशोत्सवाकडे पाहिले जाते.अगदी अर्धा फुटापासुन ते १० फूटापर्यतच्या श्रीगणेशमूर्ती गणेशोत्सवा मध्ये पहावयास मिळतात.ग्रामीण भागातही अनेक चित्रशाळेमध्ये कारागीर बनवत असल्याचे दिसुन येते. गणेशमूर्ती तयार झाल्या असुन रंगकाम करण्याचे काम वेगात सूरू आहे. आकर्षक श्रीगणेश मूर्तीला मोठ्या प्रमाणावर मागणी असते त्यामुळे अनेक कारागीरांचा आकर्षक मूर्ती बनवण्याचे कल असतो सध्या खारअंबोली येथील नामदेव वारगे चित्रशाळेत वेगवेगळ्या आकाराच्या मूर्ती तयार असून रंगकामही अंतिम टप्प्यात आल्याचे पहावयास मिळते.

# गणेशोत्सवात एसटीच्या फेऱ्या वाढवण्यासाठी माणगाव आगार प्रमुखांना निवेदन सादर

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील महागाव – कोरखंडे विभागासाठी असणाऱ्या परिवहन मंडळाच्या सध्या चालू असलेल्या लालपरीच्या फेऱ्यांमध्ये गणेश गौरी उत्सव जवळ आल्याने गाड्यांच्या फेऱ्या इंदापूर ते कोरखंडे वाढवीणेसाठीचे या भागातील प्रवाशांनी माणगाव आगारप्रमुखास मागणीचे निवेदन २२ ऑगस्ट रोजी माजी सरपंच विठोबा साबळे, पोलिस पाटील कमलाकर मांगले,सुभाष पिंगळे, संतोष आमले, कांतीलाल कसबले आदिंनी दिले.



तळा तालुक्यातील महागाव विभाग हा डोंगराळ दुर्गम भाग असून नेहमी प्रमाणे नियमित चार एस.टी.च्या फेऱ्या व एक वस्तीची गाडी सुरू आहेत. काहीवेळा तर सण उत्सवाचे दिवस आले की अचानक एखादी फेरी रद्दही करतात. अशावेळी प्रवाशांना जादाचे भाडे देऊन जावे लागते. तरी अशी अचानक फेरी बंद करू नये.

आता गणेशोत्सव चार दिवसांवरती येऊन ठेपला असून या सणासाठी चाकरमानी मंडळी गावाकडे येण्यास सुरूवात झाली आहे.तसेच गणेशोत्सवासाठी रंग, किराणा माल, गणेशोत्सवासाठीचे साहित्य खरेदीसाठी महामार्गावर असणाऱ्या अंदाजे बारा गावांतील नागरिक प्रवास करतात.या एस.टीच्या गाड्यांना गर्दी होत आहे.तरी या गणेश गौरी उत्सवासाठी त्वरीत इंदापूर ते कोरखंडे एस.टीच्या फेऱ्या वाढवाव्यात अशी मागणी निवेदनातून केली आहे.तरी सदर बाबींचा विचार करून आगारप्रमुखांनी एस.टी फेऱ्यांमध्ये वाढ करावी.

# सोनसाखळी हिसकावली, दुकान फोडले, गर्दीत लूट

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत पोलिस ठाणे हद्दीत दिवसेंदिवस वाढणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये तीव्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावण्याच्या घटना वारंवार घडत असून, पोलिस प्रशासन मात्र या चोरट्यांना अद्यापही पकडण्यात अपयशी ठरत असल्याने लोकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

२० ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास म्हाडा कॉलनीतील अंतर्गत रस्त्यावर, अंबा माता मंदिरात आरती करून परतणाऱ्या महिलेच्या गळ्यातील तब्बल ६५ हजार रुपये किमतीची सोनसाखळी दोन अज्ञात चोरट्यांनी मोटरसायकलवरून हिसकावून नेली. या घटनेनंतर महिलेचा जीव थोडक्यात वाचला असला तरी त्यांच्या गळ्यातील मौल्यवान दागिना चोरट्यांनी लंपास केला.या प्रकरणी कर्जत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास पोसई वरक करीत आहेत.

गुन्हे

नुकतीच कर्जत शहरातील बाजारपेठेत झालेली एक घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे.किराणा दुकानात खरेदीसाठी आलेल्या व्यक्तीच्या खिशातून चोरट्याने पैसे चोरून चोर फरार झाला.पिशवीच्या आडून या चोरट्याने पीडित व्यक्तीच्या खिशातील पैसे काढून नेले आहेत.याशिवाय, उमरोली येथे दुकानाचे काम सुरू असताना रात्री १२ वाजण्याच्या सुमारस अज्ञात चोरट्यांनी शटर वाकवून जनरेटर चोरून नेल्याने तक्रारदार रमण मारुती शेळके यांचे अर्थिक नुकसान झाले आहे.

# रोह्यात खिडकी येथे गावठी हातभट्टी उद्ध्वस्त



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील खिडकी येथे विनापरवाना गावठी हातभट्टी चालविली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळताच रोहा पोलिसांनी धडक कारवाई करून तब्बल ९१,२०० किमतीचा दारू साठा जप्त व नष्ट केला.

खिडकी गावच्या डोंगर परिसरात ओवहळच्या बाजूला झाडाखाली आरोपी मिथुन काशिनाथ हिरवे (वय ३१, रा. खिडकी, ता. रोहा) हा गावठी हातभट्टी चालवत होता. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ सापळा रचून कारवाई केली. जप्त केलेला साठा पुढील प्रमाणे अंदाजे ६० लिटर तयार दारू (एकूण किंमत ६,०००), प्रत्येकी २० लिटर क्षमतेचे ३ प्लास्टिक कॅन सहा निळ्या रंगाचे पिंप (८४,००० रुपये किमतीचे) , नवसागर मिश्रीत गुळ वापरून तयार केलेले रसायन एकूण ९१,२०० किमतीची दारू व साहित्य पोलिसांनी जप्त केले.

आरोपी मिथुन हिरवे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र दौंडकर व पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## माथेरानमध्ये पावसाने उसंत घेतल्याने दिलासा

**माथेरान :** सहा ते सात दिवसांपासून जोरदार बरसणाऱ्या पावसाने उसंत घेतल्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.दिवसभर ढगाळ वातावरण असले तरी पावसाचा जोर कमी झाल्यामुळे बाजार पेठेत पर्यटक भटकंती करताना दिसत होते.बाजार पेठेत पर्यटकांची रेलचेल सुरू झाल्यानेव्यापारी वर्ग पण समाधान व्यक्त करीत होते.

श्रावण महिन्यात पावसाचे रौद्र रूप माथेरानकरांना पहावयास मिळाले.दिवसेंदिवस पावसाचा जोर वाढत असल्याने नागरिकांनी घरात राहणे पसंत केले.तसेच पर्यटक देखील हॉटेल बाहेर निघाले नाहीत.आता कुठे पावसाचा जोर कमी झाल्याने पर्यटकांची वर्दळ दिसत आहे. पावसाने चांगली उसंत घेतल्याने व गणेशोत्सव देखील काही दिवसांवर आला असल्याने स्थानिकांची कामाची लगबग येथे सुरू झालेली दिसत आहे.गणेश मूर्ती घेऊन येणे तसेच सजावटीचे सामानअन्य खरेदी करीता माथेरानकर माथेरान बाहेर जाणे येणे सुरू झालेले दिसत आहे.

# नदीत उडी मारलेल्या महिलेला नागोठणे पोलिसांनी वाचविले

**नागोठणे : बातमीदार**

घरगुती भांडणाच्या वादातुन रागाच्या भरात नागोठण्यातील एका महिलेले येथील अंबा नदीत जीव देण्याच्या उद्देशाने उडी घेतली. याबाबत माहिती माहिती मिळताच क्षणी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलिसांनी धाडसी कामगिरी करून स्वतःचा जीव धोक्यात टाकून त्या महिलेचे जीव वाचविले.याबाबत नागोठणे पोलिसांच्या कर्तव्यदक्ष पणा बद्दल सर्वत्र कौतुक केले जात आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की २१ ऑगस्ट रोजी रात्री ९.१५ च्या सुमारास आशा दिपक गुंजाळ वय २५ रा. रामनगर नागोठणे हीने घरगुती वादातून रागाच्या भरात जुना वरवठणे पुल येथून अंबा नदीच्या वाहत्या पाण्यात उडी मारली. माहिती मिळताच क्षणी नागोठणे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्यासह पोलीस हवालदार महेश लांगी, अथर्व पाटील, स्वप्नील भालेराव, महेश रुईकर, पोलीस शिपाई विक्रांत बधानका व सुनिल वाघ यांनी स्वतः वरवठणे नवीन ब्रिजखाली जाऊन महिलेला नदीतून बाहेर काढून जीव वाचवला.

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा
राम प्रहर


महावितरण

## निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग रोहा कार्यालयाअंतर्गत असणारे उच्चदाब वाहिनीच्या प्रतिबंधात्मक दुरुस्ती व देखभालीच्या कामासाठी वर्ष २०२५–२६ च्या करारासाठी परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नेमणुक करणेसाठी ई–निविदा क्रमांक टी–०५,२०२५–२६ एकूण ०१ निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि. २३.०८.२०२५ ते ०८.०९.२०२५ पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारिख दि. ०८.०९.२०२५ ला रात्रौ ११.५५ वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत / शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेत स्थळावर प्रकाशित केला जाईल.

**PRO NO - 228** **कार्यकारी अभियंत्ता, रोहा विभाग**

महावितरण

## निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग रोहा कार्यालयाअंतर्गत असणारे लघुदाब वाहिनीच्या प्रतिबंधात्मक दुरुस्ती व देखभालीच्या कामासाठी वर्ष २०२५–२६च्या करारासाठी परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नेमणुक करणेसाठी ई–निविदा क्रमांक टी–०६,२०२५–२६ एकूण ०१ निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि. २३.०८.२०२५ ते ०८.०९.२०२५ पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारिख दि. ०८.०९.२०२५ ला रात्रौ ११.५५ वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत / शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेत स्थळावर प्रकाशित केला जाईल.

**PRO NO - 228** **कार्यकारी अभियंत्ता, रोहा विभाग**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल करावयात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे – खानाव, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| गट / सर्व्हे नंबर | उपविभाग/ हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रू. पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| २२ | – | जिरायत ० – १० – ८०<br>पो.ख. ० – ०१ – ३०<br>एकूण ० – १२ – १० | २.१९ | श्री. मारूती दादू पाटील |

दिनांक : २२/०८/२०२५

**सही/–**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर ४, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

## नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH2021CC-6982B मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH-46-BP1244 चे मालक **धर्मा गणेश गोवारी** यांचे तारीख १६/०१/२०२५ रोजी निधन झालेले आहे.

मी जनाबाई धर्मा गोवारी, हाऊस नं १२३३/२, कोळीवाडा, चांगा पाडा भोईर मार्ग कोळीवाडा ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – जनाबाई धर्मा गोवारी,**
**पत्ता– हाऊस नं १२३३/२, कोळीवाडा, चांगा पाडा भोईर मार्ग कोळीवाडा ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६**

# पनवेल महानगरपालिका

## ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बांधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | नुसरत शहा, प्लॉट नं. १३, रोड नं. ०४, सेक्टर ११, नवीन पनवेल, ता. पनवेल जि. रायगड. | ०१ नारळ व ०१ आंबा अशी एकूण ०२ झाडे झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं. १३, रोड नं. ०४, सेक्टर– ११, नवीन पनवेल, ता. पनवेल जि. रायगड या भूखंडाच्या आवारातील ०१ नारळ व ०१ आंबा अशी एकूण ०२ झाडे नविन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| २ | श्री. राजेश जगे, सेक्टर – १३, ए ५७/१, न्यु पनवेल, ता. पनवेल जि. रायगड | ०१ उंबर तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील सेक्टर –१३, ए ५७/१, न्यु पनवेल, ता. पनवेल जि. रायगड येथे रस्त्यावरील ०१ उंबर झाड हे धोकादायक पडण्याच्या स्थितीत असून सदर झाडाची मुळे घरात पसरल्याने भिंतीला तडे गेले असल्याणे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर करावयात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**जा.क्र.:–पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र.४०९/४१६/२०२५**
**दिनांक :– २२/०८/२०२५**

**सही/–**
**उपायुक्त**
**(तथा वृक्ष अधिकारी)**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे ग्राहक श्री. सुमित सुनील मराठे आणि सौ विजेता सुनील मराठे, हे दोघे रो हाउस, ई – ४७/३०, सेक्टर –१२, खारघर या रो हाउसचे सध्या खरेदी करत आहेत. यांनी हा रो हाउस सौ रंजना संदीप शिंदे आणि श्री संदीप सुभाष शिंदे यांच्याकडून ॲग्रीमेंट फॉर सेलनुसार दिनांक १०/०७/२०२५ रोजी खरेदी करत आहेत.

जर कोणाचेही काही गहाणखत, न्यायालयीन बाबी अथवा कोणतेही वारस हक्क असल्यास सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेदरम्यान आमच्या कार्यालयाला प्रत्यक्ष भेट द्या. जर यापैकी कोणत्याही प्रकारचे दावे असतील तर योग्य त्या प्रकारची कागदपत्रे जमा करा. हे या सार्वजनिक पेपर नोटीसच्या ७ दिवसांच्या आत पूर्ण करणे आवश्यक आहे. यानंतर कोणत्याही प्रकारची तक्रार व दाव्यांचे उत्तर दिले जाणार नाही व पुढील कामासाठी म्हणजेच सेल डीड आणि सीडको ट्रान्स्फर केली जाईल.

दिनांक :– २२/०८/२०२५

**Ad/-**
**ADITYA R. KATAKDOUND**
Advocate High Court
Kharghacha Raja Ganesh Mandir (Basement), Opp. Gokhale School, Sector 12, Kharghar, Navi Mumbai- 410 210, Mob:- 9594962207, e-mail-adv.k.aditya23@gmail.

# नवी मुंबईत गणेश विसर्जनासाठी १३९ कृत्रिम तलाव

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

यंदाच्या गणेशोत्सवातही जलप्रदूषण टाळण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका १३९ कृत्रिम तलाव तयार करणार आहे. कृत्रिम तलावांच्या जागा परिमंडळ व अभियांत्रिकी विभागामार्फत निश्चित करण्यात आल्या आहेत. अशाप्रकारे पारंपारिक २२ व कृत्रिम १३९ अशा १६१ विसर्जन स्थळांवर श्रीगणेश मूर्तींचे विसर्जन करण्याच्या प्राथमिक तयारीला पालिका प्रशासन लागले आहे.



तलावातील जलप्रदूषण रोखण्यासाठी पालिकेच्या १४ मुख्य तलावातील जलाशयाच्या साधारणत: ३० टक्के भागात नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत गॅबियन वॉल उभारण्यात आल्या असून या विशिष्ट क्षेत्रात नागरिकांनी श्रीमूर्ती विसर्जन करावे आणि जलप्रदूषण रोखावे असे आवाहन पालिकेने केले आहे.त्याचप्रमाणे पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे मंडळांना आवाहन करताना श्रीगणेश मूर्तीच्या विसर्जनासाठी नागरिकांना त्यांच्या घरापासून जवळ विसर्जनस्थळे उपलब्ध व्हावीत याची खबरदारी घेत मोठया प्रमाणावर कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात येणार आहे. महापालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्या नियंत्रणाखाली आठही विभागांमध्ये मध्यवर्ती ठिकाणी नागरिकांची मागणी व मागील वर्षीचा अनुभव लक्षात घेता कृत्रिम तलाव तयार करण्यात येणार आहेत. पालिकेकडून १३९ कृत्रिम तलाव बनविण्यात येणार आहेत.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात २२ पारंपारिक विर्सजन स्थळे असून त्याठिकाणी होणारी भाविकांची गर्दी विभागली जावी व एकाच ठिकाणी गर्दी होऊ नये याकरीता गेल्या सहा वर्षांपासून कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात येत आहे. या कृत्रिम तलावांना नागरिकांचा दरवर्षी चांगला प्रतिसाद मिळत आहे.

गतवर्षी कृत्रिम तलावात १४ हजारापेक्षा अधिक गणेशमूर्तींचे विसर्जन करून नवी मुंबईकर नागरिकांनी आपल्या पर्यावरण विषयक जागरुकतेचा प्रत्यय दिला होता.

**विभागवार कृत्रिम तलावांची संख्या**

बेलापूर-१९, नेरुळ-२६,
वाशी-१६, तुर्भे-२०,
कोपरखैरणे-१५,
घणसोली-१६,
ऐरोली-१८, दिघा-९
**एकूण-१३९**

# न्हावा प्रकल्पांतर्गत सायबर गुन्हे, सुरक्षा व रस्ते वाहतूक उपक्रम

**उरण : प्रतिनिधी**

न्हावा लेडी खातून मरियम विद्यालयामध्ये २१ ऑगस्ट रोजी सायबर सुरक्षा व रोड सेफ्टीवर विद्यार्थ्यांनी घ्यावयाची काळजी या विषयावर न्हावाशेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम मुजावर तसेच सायबर गुन्हे व डिजिटल फॉरेन्सिक विशेषज्ञ विदाश्री भांगे यांचे अभ्यासपूर्ण समुपदेशन झाले.



न्हावाशेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम.मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली व लेडी खातून मरियम अंतर्गत संपन्न झालेल्या या समुपदेशन शिबीरास न्हावाशेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम.मुजावर तसेच हवालदार किरण म्हात्रे व मोरे ,कर्मचारी सचिन ठाकूर विद्यालयाच्या प्राचार्या दैसम्मा पॉल,उपमुख्याध्यापक प्रियरंजन त्रिपाठी, पर्यवेक्षक जितेंद्र महाजन आदी उपस्थित होते.

सायबर गुन्हे व डिजिटल फॉरेन्सिक विशेषज्ञ विदाश्री भांगे यांनी फेसबुक ,स्नॅपचॅट, व्हाट्सअप,इंस्टाग्राम याद्वारे होणाऱ्या गुन्ह्यांबद्दल माहिती दिली तसेच आपल्याकडून कोणताही गुन्हा घडला नसेल तर सायबर हेल्पलाइनची मदत घेणे कसे आवश्यक आहे या विषयी विस्ताराने माहिती देऊन समुपदेशन केले.

वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी. एम.मुजावर यांनी दुचाकी वाहनस्वारास हेल्मेटची अनिवार्यता तसेच रस्ता ओलांडताना सिग्नलचे ज्ञान व विविध वाहतूक चिन्हांची माहिती दिली तसेच अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी या विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक,सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ज्येष्ठ शिक्षक जितेंद्र महाजन यांनी केले.

# गणेशोत्सवासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे -अपर पोलीस महासंचालक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यात सर्वत्र उत्साहात साजरा होणारा गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा केला जाणार आहे. कोकणातील गणेशोत्सव शांततेत, सुरळीत आणि विनाअपघाती व्हावा, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वरील वाहनांची वर्दळ नियंत्रीत करण्यासाठी विशेष नियोजन करण्यात येणार असून, नागरिकांनी देखील प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) प्रविण साळुंके यांनी केले आहे.

गणेशोत्सव काळात गणेश भक्तांना त्यांच्या गावी वेळेत पोहचता यावे व गणेशोत्सवा दरम्यान वाहतुक कोंडी न होता हा सण निर्विघ्नपणे पार पाडावा यासाठी आज नवीमुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये गणेशोत्सव-२०२५ निमित्त समन्वय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस रायगड पोलीस अधिक्षक (महामार्ग) तानाजी चिखले, नवी मुंबई पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, आय.आर.बी, सार्वजनिक बांधकाम विभाग, राज्य परिवहन महामंडळ, आरोग्य विभाग या विभागातील अधिकारी तसेच कोकण विभागातील पोलीस अधिक्षक, अपर पोलीस अधिक्षक, सहायक पोलीस अधिक्षक, पोलीस उपनिरीक्षक, पुणे विभागाचे महामार्ग पोलीस अधिक्षक उपस्थित होते.



गणेशोत्सव काळात राज्याच्या विविध ठिकाणांहून चाकरमाने कोकणात आपल्या गावी मोठया संख्येने जातात. गणेशोत्सवादरम्यान येणाऱ्या शासकीय सुट्टयांमुळे राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वरील वाहतुक कोंडी लक्षात घेता पोलीस प्रशासनामार्फत वाहतुकीचे विशेष नियोजन करण्यात आले असल्याची माहिती अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) श्री. साळुंके यांनी दिली. महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ अंतर्गत मुंबई-पुणे दृतगती महामार्गावर गणेशोत्सव काळात वाहतुक कोंडी होऊ नये यासाठी डेल्टा फोर्स व पेट्रोलिंग वाहनांची गस्त वाढविण्यात आली आहे. वाहतुक सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्याठिकाणी सुचना फलक, रंबलर स्ट्रीप, गतीरोधक फलक, वाहतुक नियंत्रण सुचना फलक आदि लावण्यात आले आहेत.

घाट क्षेत्रातील दरड कोसळणाऱ्या ठिकाणी लोखंडी जाळ्या लावण्यात आल्या आहेत. महामार्ग क्र. ४८ वर किरकोळ दुरुस्ती अंतर्गत खड्डे बुजविणे, बाजूपट्ट्या दुरुस्त करणे, लेन मार्किंग करणे, माहिती फलक स्वच्छ करणे इत्यादी कामे पूर्ण झाली आहेत. बोर घाटात अपघात कालीन परिस्थिती उद्भवल्यास एकूण ४ ठिकाणी वाहतुक नियंत्रण व नियोजन करण्यासाठी घाट निरिक्षक प्रतिसाद पथक २४ तास तैनात करण्यात आले आहे.

गणेशोत्सव काळात कोकणात जाणाऱ्या जनतेची वाढती संख्या लक्षात घेता महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळामार्फत दि. २३ ते २७ ऑगस्ट या कालावधीत ५ हजार बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. विशेषत: माणगाव आणि इंदापूर एसटी डेपोच्या परिसरातील बसेसच्या पार्किंगमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीचे नियोजन करण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. प्रवासादरम्यान महामार्गावर वाहतूक कोंडी होणार नाही यासाठी एसटी महामंडळाच्या चालक आणि वाहकांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. अपघात टाळण्याकरिता चालक आणि वाहक यांची अल्कोहोल चाचणी करण्यात येणार आहे. सहा अपघात प्रवण क्षेत्रात महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे फिरते पथक तैनात ठेवण्यात येणार आहेत. बसस्टँडवरील चोरी सारखे अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व प्रकारची काळजी मंडळामार्फत घेण्यात येणार असल्याची माहिती यावेळी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या प्रतिनिधींनी दिली.

राष्ट्रीय महामार्गावर गणेश भक्तांच्या सेवा सुविधांसाठी दर १५ कि.मी. अंतरावर सुविधाकेंद्र उभारण्यात येणार असून या सुविधा केंद्रात पोलीस मदत कक्ष, आरोग्य विषयक सुविधा, शौचालय, चहापान कक्ष, स्तनदा मातांसाठी स्वतंत्र कक्ष तयार करण्यात येणार आहेत. तसेच वाहनांच्या दूरुस्तीचीही व्यवस्था करण्यात येणार आहे. वैद्यकीय मदतीसाठी मुंबई-गोवा महामार्गावर २३ ठिकाणी रुग्णवाहिका तैनात ठेवण्यात येणार आहेत. आपत्ती व्यवस्थापनासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

यावेळी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वरील ब्लॅक स्पॉट, रस्ते दुरुस्ती तसेच इतर अडचणींबाबत चर्चाकरण्यात आली. गणेशोत्सवादरम्यान शासनाच्या विविध विभागांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत चर्चा करण्यात आली.

# उरण महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा



**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील रेड रिबीन क्लब च्या वतीने पुढाकार घेऊन एचआयव्ही एड्स यासंदर्भात विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मिक गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात एचआयव्ही समुपदेशक महादेव पवार (इंदिरा गांधी हॉस्पिटल ) उरण व टेक्निशियन तृप्ती परजने उपस्थित होत्या. यावेळी महादेव पवार यांनी एच आय व्ही ची कारणे विषद करताना गरोदर माता पॉझिटिव्ह असेल तर मुलाला होतो, एच आय व्ही पॉझिटिव्ह रक्त घेतले तर, तसेच महत्त्वाचे म्हणजे असुरक्षित यौन संबंध यातून एचआयव्ही होतो याविषयी त्यांनी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख डॉ.ए.के. गायकवाड यांनी केले तर उपस्थितांचे आभार व अध्यक्षीय समारोप आयक्यूएसी समन्वयक डॉ. ए.आर चव्हाण यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.दत्ता हिंगमिरे यांनी केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# उरण येथील यमुना मंडळ सत्संगला १०० वर्षे पूर्ण

**उरण : वार्ताहर**

येथील यमुना मंडळ सत्संगाला यंदा शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत. १०० वर्षे सतत चालणारे व १०० वर्षे कोणताही खंड न पडता सातत्याने चालू असणारे उरण शहरातील एकमेव मंडळ आहे.

यमुना मंडळ सत्संग सुरू करणारे संस्थापक कै. मणीबेन, कै.सक्रीबा, कै.मंगळाबेन, कै. अंजवाली बेन आदींनी योगदान दिलेले आहे. सध्या या मंडळात २० महिला सदस्य आहेत.

मंजुळा बेन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज सायंकाळी ५ ते ६.३० वाजेपर्यंत उरण गणपती मंदिराजवळ श्री राम मंदिरात सत्संग चालतो. या सत्संगामध्ये रामायण अध्याय तीन, गीता वाचन, भजन, पाठ घेतले जातात.



# शस्त्रक्रिया न करता काढला तीन सेंमी लांबीचा पित्तनलिकेतील खडा

**नवी मुंबई : बातमीदार**

खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे गॅस्ट्रोएन्टरोलॉजिस्ट, यकृततज्ज्ञ आणि एंडोस्कोपिस्ट डॉ. रावसाहेब राठोड यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ७० वर्षीय महिलेच्या पित्तनलिकेमध्ये अडकलेला तीन सेंमीचा खडा काढून टाकण्यासाठी मिनिमली इनवेसिव्ह प्रक्रियेचा वापर केला. कावीळ झालेल्या या वयोवृध्द रुग्णाला यापूर्वी ईआरसीपी (एंडोस्कोपिक रेट्रोग्रेड कोलॅन्जिओपँक्रिएटोग्राफी) करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता मात्र ते प्रयत्न अयशस्वी ठरल्याने तिला पाहिजे तसा आराम मिळाला नाही. त्यानंतर रुग्णावर प्रगत एंडोस्कोपिक उपचार, स्पायग्लास कोलॅन्जिओस्कोपी करण्यात आली, ज्यामध्ये प्रक्रियेनंतर ती अवघ्या २४ तासांच्या आत पूर्णपणे बरी झाली.



पनवेल येथील राहणाऱ्या श्रीमती सुशीला चव्हाण या गेल्या दोन महिन्यांपासून तीव्र पोटदुखी आणि कावीळच्या समस्येशी झगडत होत्या. रुग्णाने यापुर्वी अनेक डॉक्टरांचा सल्ला घेतला आणि दोनदा ईआरसीपी केले. मात्र तरीदेखील तिच्या प्रकृतीत सुधारणा झाली नाही आणि ती तिची दैनंदिन कामे स्वतंत्रपणे करू शकत नव्हती. तिला दैनंदिन कामाकरिता कुटुंबातील सदस्यांची मदत घ्यावी लागत होती. पुढील उपचाराकरिता तिच्या कुटुंबियांनी रुग्णाला मेडिकव्हर रुग्णालयात नेले.

डॉ. रावसाहेब राठोड सांगतात की, जेव्हा रुग्ण आमच्याकडे उपचाराकरिता आला तेव्हा त्याला ताप आणि कावीळची लक्षणी दिसून आली. रक्त तपासणीत यकृताच्या कार्यामध्ये बिघाड झाल्याचे आढळून आले. तिच्या एमआरसीपीमध्ये सामान्य पित्त नलिकेत अडथळा निर्माण करणारा एक मोठा खडा दिसून आला. पित्त नलिकेत इतका मोठा खडा असणे दुर्मिळ आहे. पारंपारिक ईआरसीपी पध्दतीने तो खडा काढून टाकणे अशक्य होते, त्यामुळे शस्त्रक्रिया हा एकमेव पारंपारिक पर्याय राहिला.

तथापि, अशा प्रकरणांमध्ये गुंतागुंत होण्याचा धोका अधिक असतो, विशेषतः वयोवृद्ध रुग्णांना याचा धोका अधिक असतो. स्पायग्लास कोलॅन्जिओस्कोपी, एक अत्याधुनिक, किमान आक्रमक तंत्र वापरत पित्त नलिकेत लहान-कॅलिबर स्कोप काळजीपूर्वक वापरला. यात ३ सेमी आकाराचा खडा आढळला जो दिर्घकाळापासून त्या ठिकाणी अडकून राहिला होता. इलेक्ट्रोहायड्रॉलिक लेसर वापरून तो तोडण्यात आला आणि बलून कॅथेटरच्या मदतीने सर्व कचरा हळूवारपणे काढून टाकण्यात आला. पित्त नलिकाची संपूर्ण साफसफाई झाली आणि रुग्णाला फक्त एका दिवसात रुग्णाला स्थिर स्थितीत घरी सोडण्यात आले.

# वीर वाजेकर महाविद्यालयात वित्तीय साक्षरता कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

आधुनिक युगात वित्तीय शिस्त व आर्थिक नियोजन हे प्रत्येकासाठी महत्त्वाचे ठरत आहे. याच पार्श्वभूमीवर रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर ए. एस. सी. महाविद्यालय, फुंडे येथे वित्तीय साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी भूषविले.

या कार्यक्रमात प्रमुख व्याख्यान सुषमा दास यांनी दिले. आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनात त्यांनी विद्यार्थ्यांना पैशाचे सुयोग्य नियोजन, उत्पन्न आणि खर्चाचा समतोल, बचतीचे महत्त्व, गुंतवणुकीचे विविध पर्याय, कर्ज व्यवस्थापन, तसेच विमा आणि निवृत्ती नियोजन याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी प्रत्यक्ष उदाहरणे देत विद्यार्थ्यांना योग्य निर्णय घेण्यासाठी आवश्यक आर्थिक शहाणपण आत्मसात करण्याचे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना वित्तीय शिस्त अंगीकारण्याचे आवाहन करताना सांगितले की, आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षणाइतकेच वित्तीय नियोजन आणि बचतसुद्धा महत्त्वाची आहे. योग्य वित्तीय नियोजन केल्यास प्रत्येक विद्यार्थी भविष्यात सक्षम नागरिक म्हणून देशाच्या प्रगतीत योगदान देऊ शकतो.



या कार्यक्रमाला प्रांजल भोईर, भूषण ठाकूर, प्रियांका ठाकूर, दीक्षिता म्हात्रे, रेनू सरोज, तन्वी कोळी आणि आरती पाटील आदी प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत श्री भूषण ठाकुर यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार प्रांजल भोईर यांनी मानले. विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अनेक विद्यार्थ्यांनी कार्यक्रमानंतर शंका विचारून आर्थिक नियोजनाबाबत आपली समज वाढवली.

या वित्तीय साक्षरता कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक निर्णय क्षमता, बचतीची सवय व जबाबदार गुंतवणूक वृत्ती विकसित होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी झाले.

रामप्रहर श्रावणधारा

## श्रावण सखीचा..

हिरवी हिरवी शाल पांघरुनी
डोंगर, दऱ्या शृंगारती,
मंद श्रावण धारा धावत येती...
अन हळुवार मृदगंधी झुलती नाचती,
सखीच्या मनी हळवे भास दाटती..
कुजबुजे झाडावर कोकिळा,
ओल्या वेलीवर नाचे मन मंजुळा...
हळव्या आठवांची ओढ श्रावणाला,
लालीमा त्या स्पर्शाचा सखीच्या गाला...
कधी त्या रानात गायली गाणी,
ओंजळीत साठवले श्रावण पाणी...
सखा दाटून येतो मनी त्या क्षणी,
सखीसवे भिजतो सखीच्या श्रावणी
सखीच्या केशकलापी फुलला मोगरा धुंद,
श्रावणासह मनात वाहे मंद सुगंध...
त्या मुक्त सरींना मिळती नवे रंग,
श्रावण देतो मनी स्वप्न उमंग...
श्रावण गातो तिच्या श्वासांची गाणी,
सरी घेऊन येती स्मरणातील श्रावणी...
नजरेत ओथंबती न उमललेले बोल,
श्रावण सावरतो तिच्या विरहाचा डोल
सखी विनवते...
ये ना.. या श्रावणात तरी,
गात्रात साठवू या श्रावणसरी...
तो येतो, सरींवर स्वार होऊनी,
विरघळती दोघे श्रावण मिठीत घेऊनी



- विद्या निकम, ठाणे

# गणेशमूर्तीकारांची समन्वय बैठक

## पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी केले मार्गदर्शन

**पेण : प्रतिनिधी**

पोलीस प्रशासनाच्या वतीने पेण तालुक्यातील गणेशमूर्तीकारांची समन्वय बैठक पेण नगर परिषदेच्या सभागृहात कोकण परिक्षेत्र पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी दराडे यांनी आपण जी मूर्ती ट्रान्सपोर्ट करतानाची समस्या मांडली आहे त्यात पोलीस प्रशासन नक्कीच सहकार्याची भूमिका बजावेल, असे आश्वासित केले.

या बैठकीस रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अभिजित फडतरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक संदीप बागुल, प्रसाद पांढरे, संजयकुमार ब्राम्हणे यांच्यासह पेणमधील गणेश मूर्तीकार, शांतता कमिटी सदस्य आणि प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.



या वेळी कारखानदारांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर त्यांना मार्गदर्शन पोलीस महानिरीक्षक संजय दराडे म्हणाले की, बाप्पाच्या मूर्ती पेणममधून इतरत्र दळणवळणाच्या माध्यमातून नेताना आपल्या गाडीला गणपतीची गाडी असल्याचा स्टिकर लावा, जेणेकरून आमच्या कर्मचाऱ्यांना ती गणपतीची गाडी आहे असे समजेल व त्यानुसार त्यांना सहकार्य करता येईल. त्याचप्रमाणे इतर व्यापाऱ्यांनादेखील ट्रान्सपोर्टच्या बाबतीत अडचण होणार नाही यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू.

पुढे त्यांनी म्हटले की, आपण कारखानदारांनी जी जागेची समस्या मांडली आहे त्याबाबत संबंधित लोकप्रतिनिधी, पालकमंत्री, जिल्हाधिकारी यांच्याशी योग्य तो पत्रव्यवहार करा. इतर शहरातील वाहतूक व्यवस्था चोखपणे पार पाडण्यासाठी आमचे पोलीस दल सज्ज आहे. यापुढे वर्षातून दोन वेळा गणपती कारखानदारांशी संवाद साधला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

या वेळी गणपती कारखानदार श्रीकांत देवधर, नितीन मोकल, मयुरेश चव्हाण, सागर पवार यांच्यासह मंगेश नेने, संतोष पाटील यांनी विविध समस्या मांडल्या, तर पोलीस प्रशासनाच्या वतीने उपस्थित गणपती कारखानदारांचा सत्कार करण्यात आला.

आम्ही ट्रान्सपोर्टच्या वेळी येणाऱ्या अडचणी आणि जागेच्या अभावाबाबत समस्या मांडल्यानंतर पोलीस महानिरीक्षकांनी ज्या सूचना दिल्या त्याप्रमाणे आम्ही सर्व एकत्र येऊन जिल्हा उद्योग केंद्रामार्फत विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. पोलीस प्रशासनाने जी कारखानदारांच्या व्यवसायात त्यांच्या पद्धतीने सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली त्याबाबत आम्ही समाधानी आहोत, अशी प्रतिक्रिया या वेळी श्रीकांत देवधर यांनी दिली.

# कशेणे-इंदापूर परिसरातील बिबट्याचा बंदोबस्त करावा

## वनरक्षकांना निवेदन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील कशेणे, इंदापूर परिसरात गेल्या पंधरा दिवसांपासून बिबट्याचा मुक्त संचार असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राहिवासी भागात संचार करत असलेल्या बिबट्याचे दोन-तीन वेळा सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चित्रीकरणही झाले असून लहान मुले, महिला तसेच गावातील नागरिकांना घराबाहेर पडणे धोकादायक झाले आहे.

मुंबई-गोवा महामार्गावर असलेल्या कशेणे व इंदापूर परिसरात बिबट्याचा धोकादायक वावर आहे. या बिबट्याने गावातील कुत्री, मांजरं नेऊन खाल्ली आहेत. त्यामुळे अधिकच भीती पसरली आहे. शेतकऱ्यांना तर आपल्या शेतात जाणे मुश्कील झाले आहे. या बिबट्याला सापळा लावून पिंजऱ्यात जेरबंद करून दूर जंगलात सोडावे, अशी मागणी शिवसेना युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांनी माणगाव वन विभागाचे वनक्षेत्रपाल प्रशांत शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. सोबत युवासेना तालुकाप्रमुख राजेश कदम, शहरप्रमुख सौरभ खैरे, निलेश पाखड, सरियार खान, रोहित मोहिते, सुजित राजमाने, वनपाल इंदापूर, विलास तांबे, वनपाल तळा, सुनील नवगणे, लेखापाल माणगाव वनक्षेत्र उपस्थित होते.

या निवेदनात म्हटलेय की, गेल्या काही दिवसांत बिबट्याने पाळीव प्राण्यांवर व जनावरांवर हल्ला केल्याच्या घटना घडल्या असल्याचे स्थानिकांनी सांगितले. शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान होत आहे. मुलांना शाळेत जाण्यासाठी पालक स्वतः सोबत घेऊन जातात, तर महिलांना शेतात किंवा बाजारपेठेत जाण्याचीही भीती वाटते. गावकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने कार्यवाही करावी.

या वेळी विपुल उभारे म्हणाले की, वनविभागाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तातडीने कारवाई करावी. गावकऱ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. अन्यथा ग्रामस्थांना मोठ्या प्रमाणावर आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी या निवेदनाची नोंद घेतली असून लवकरच आवश्यक ती पावले उचलण्यात येतील, असे आश्वासन दिले आहे. त्यामुळे आता वनविभाग याबाबत काय कारवाही करतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दहिवली पूल धोकादायक; अवजड वाहनांना बंदी

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नेरळ-कळंब राज्य मार्गावरील दहिवली पूल धोकादायक बनला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रत्यक्ष पाहणी करून हा पूल धोकादायक असल्याचे जाहीर केले असून पुलाच्या दोन्ही बाजूंना बॅनर लावून याची माहिती दिली आहे.



सन १९७६मध्ये बांधण्यात आलेला दहिवली पूल तब्बल १७१ मीटर लांबीचा आहे. त्याला १९ गाळे असून प्रत्येक गाळ्याची लांबी नऊ मीटर आहे. गेल्या ४८ वर्षांपासून या पुलावरून मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरू आहे. मान्सून काळात हा पूल येथील नदीला आलेल्या पुरामुळे नेहमीच पाण्याखाली जातो. नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसातही हा पूल उल्हास नदीच्या पुरामुळे पूर्णपणे पाण्याखाली गेला होता. पाणी ओसरल्यानंतर पुलाच्या कळंब दिशेकडील टोकाजवळील भागात पाणी वाहत असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकाऱ्यांनी पाहणी केली असता पूल कमकुवत झाल्याचे निदर्शनास आले होते. यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने निर्णय घेत हलक्या वाहनांसाठी पूल सुरु ठेवला असला तरी अवजड वाहनांची वाहतूक या पुलावरून पूर्णपणे रोखण्यात आली आहे.

दररोज या पुलावरून हजारो वाहनांची ये-जा होत असते. हा पूल पूर्व-पश्चिम भागांना जोडणारा महत्वाचा दुवा असून ८०पेक्षा जास्त गावांचा संपर्क या पुलावर अवलंबून आहे. नोकरदार वर्गासाठी हा पूल वरदान असून मुंबई जाण्यासाठी नेरळ रेल्वेस्थानकात येण्यासाठी जवळचा मार्ग आहे. अवजड वाहने व मालवाहतूक मोठ्या प्रमाणात याच पुलावरून केली जात असल्याने व आता वाहतूक व व्यापारात अडथळा निर्माण होणार आहे. दरम्यान, या जुन्या पुलाच्या शेजारी नव्याने पूल बांधण्याचे काम काही काळापूर्वी सुरू करण्यात आले आहे.

# खासदार सुनील तटकरेंना लंडन येथे पुरस्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड-रत्नागिरी लोकसभा मतदारसंघाचे खासदार, राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आणि केंद्रीय इंधन समितीचे अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांना त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल लोकमत वृत्तपत्राने लंडन येथे आयोजित केलेल्या ग्लोबल इकॉनॉमिक कनव्हेशनमध्ये भारत भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

गेल्या ४५ वर्षांच्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीत खासदार सुनील तटकरे यांनी राज्याच्या मंत्रिमंडळात विविध मंत्रीपदे भूषवून शोषित आणि वंचित समाजाला न्याय मिळवून देण्याची भूमिका बजावली आहे. ते चार वेळा आमदार, तर दोन वेळा खासदार झाले आहेत. त्यांचा प्रचंड जनसंपर्क आणि कामाचा दांडगा अनुभव असून प्रशासनाचा गाढा अभ्यास आहे. त्यांनी राज्य मंत्रिमंडळात अर्थ आणि नियोजन, नगरविकास, जलसंपदा, अन्न आणि नागरी पुरवठा असे विविध मंत्री पद सांभाळून कार्याचा ठसा उमटविला आहे. त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना सामान्य माणसांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न केले. एक प्रभावी नेतृत्व म्हणून त्यांना ओळखले जाते.

सामाजिक कार्याची दखल घेऊन खासदार सुनील तटकरे यांना भारत भूषण या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

या सोहळयाला विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, 'लोकमत'चे चेअरमन डॉ. विजय दर्डा, एडिटर इन चीफ राजेंद्र दर्डा आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी भारतातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना इतरही मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. दरम्यान, या पुरस्काराने माझी जबाबदारी अधिक वाढली आहे, अशी प्रतिक्रिया खासदार तटकरे यांनी दिली.

# संत सेना महाराज यांची पुण्यतिथी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

आंबेपूर येथील नाभिक समाज सभागृहात संत सेना महाराज पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम झाले.

कार्यक्रमास विजय भोसले, विक्रांत घाडगे, सचिन आम्रे, महेश चव्हाण, समीर पवार, मनोज कदम, हरेश कदम, अशोक पवार, प्रवीण मोरे, महेश घाडगे, विशाल भोसले, राकेश मोरे, विजय लाड, गणेश भोसले, राजू लाड, अनंता क्षीरसागर, विजय मोरे, मनोहर पवार, प्रणित आयरकर, विनायक पाटील, निलेश मोरे तसेच महिला कमिटी सदस्य उपस्थित होते.

# बोरदेव मंदिरात नंदीची प्रतिष्ठापना



**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील बैलगाडी शर्यतीचे मैदान म्हणून प्रसिद्ध नागाव-साताड बंदरातील बोरदेव मंदिरात नंदीची प्रतिष्ठापना येथील उद्योजक सचिन राउळ व त्यांच्या पत्नी प्रियांका राउळ यांच्या हस्ते नुकतीच करण्यात आली.

नागाव विभाग बैलगाडी व घोडागाडी चालक, मालक तसेच सेवाभावी सामाजिक संस्था नागाव यांच्या वतीने बोरदेव मंदिरात नंदी प्रतिष्ठापना कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष सौरभ आपटे, उपाध्यक्ष एकनाथ ठाकूर, खजिनदार मंगेश आठवले, सह खजिनदार पराग ठाकूर, सचिव दिपेश म्हात्रे, सहसचिव राजेंद्र वर्तक, सदस्य रघुनाथ प्रधान, सतिश नाईक, संजय म्हात्रे, सुरेश ठाकूर, शैलेश वर्तक, सुरेश कवळे, केतन प्रधान, विनोद वाळंज, सौरभ नाईक, अरुण पाटील, सुनील पाटील, स्वराज भिडे, राकेश कवाड, अभिजित राउळ, प्रसाद सुतार, सुमित कवळे, प्रथमेश नाईक, राजेंद पाटील, विश्वानाथ प्रधान यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंगेश आठवले व संजय म्हात्रे यांनी विशेष परिश्रम घेतले.



**माणगाव : कोकणातील सर्वात मोठा म्हणून ओळखला जाणारा गणेशोत्सव काही दिवसांवर आला असून गणरायाच्या स्वागतासाठी भाविक सज्ज झाले आहेत. या पार्श्वभूमीवर गणेशोत्सवासाठी लागणाऱ्या आकर्षक मखरांनी बाजारपेठ सजली आहे.** (छाया : सलीम शेख)

# संगीतसेवक पं. उमेश चौधरी

२३ ऑगस्ट हा दिवस रायगडभूषण पं. उमेश निवृत्तीबुवा चौधरी यांचा वाढदिवस. स्वरांप्रती अपार निष्ठा, संगीतसेवा आणि समाजकारणाशी जोडलेली त्यांची कलावंताची वाटचाल यामुळे आज ते शास्त्रीय संगीत क्षेत्रातील एक मान्यवर नाव ठरले आहेत. भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी यांचा सात्विक वारसा आणि धार्मिक संस्कार यामुळे पं. उमेश चौधरी यांना लहानपणापासूनच स्वरांची गोडी लागली. बाबांचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात आदराने घेतले जाते आणि शेकडो शिष्य त्यांना गुरूस्थानी मानतात. या परंपरेशी साजेशी जबाबदारी त्यांनी स्वीकारली आणि घराणेदार गायकीच्या रचनांचा अभ्यास करून नव्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न प्रशंसनीय आहे.

पं. उमेश चौधरी यांचे नाव शास्त्रीय संगीतामधील गंभीर, अभ्यासू आणि परंपरेला न्याय देणाऱ्या आघाडीच्या गायकांमध्ये घेतले जाते. त्यांच्या रियाजातून तयार झालेल्या सादरीकरणांमध्ये घराण्याची ठाम छाप तर दिसतेच, पण त्याचबरोबर स्वतःची व्यक्तिमत्त्वपूर्ण शैलीही स्पष्ट जाणवते. बंदिशींचे मंथन, रागातील बारकावे अधोरेखित करण्याची त्यांची पद्धत आणि श्रोत्यांशी निर्माण होणारी सहज संवादात्मक नाळ यामुळे त्यांचे संगीत आजच्या पिढीलाही प्रेरणा देते.

महाराष्ट्राला सांस्कृतिक वरदान लाभलेले आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रात येथील प्रज्ञावंतांनी कर्तृत्वाची उत्तुंग शिखरे गाठली आहेत. अफाट सौंदर्याने भरलेले निसर्ग तसेच गंधर्वाच्या गोड गळ्यातील स्वरश्रीदेखील इथल्या गायक कलावंताना निसर्गतःच लाभली आहे. त्यातून असाच एक स्वरप्रेमी वारकरी सांप्रदायाची पताका, शास्त्रीय संगीताचा वारसा सांभाळत समाजकार्य करता करता सांगीतिक वाटचाल करणारे संगीत सुरमयी व्यक्तिमत्व म्हणजे नवी मुंबईतील पनवेल तालुक्यातील रांजणपाडा येथील रायगडभूषण पं. चौधरी. शिक्षणात पदवीधर, अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाची विशारद पदवी घेऊन पूर्ण केले. शास्त्रीय संगीताची आकाशवाणीची बी हाय ग्रेड, सुगम संगीताची बी ग्रेड, दूरदर्शनवर 'योगियांचा देव' या मालिकेचे संयोजन व पार्श्वगायन, सांस्कृतिक सेलचे अध्यक्ष, पं. भीमसेन जोशी गानगंधर्व पुरस्कार, रायगडभूषण, रायगड गौरव, अशी अनेक मानसन्मान आणि पुरस्कारांनी त्यांचे मान्यवरांच्या हस्ते सन्मान झाले आहेत. शास्त्रीय गायनात स्वरमंडल (झंकार वाद्य) हे केवळ सुरेल साथीचे साधन नसून परंपरेशी, साधनेशी आणि गायनातील सूक्ष्मतेशी घट्ट निगडीत आहे.



पं. उमेश चौधरी यांना जगातील पहिले शुद्ध सोन्याचा मुलामा असलेले सुवर्ण स्वरमंडल यशवंत महाराज यांच्या हस्ते प्रदान झाले, हे त्यांच्या कलासाधनेचे आणि योगदानाचे मोठे गौरवचिन्ह आहे. आध्यात्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सन्मान मिळाल्यामुळे या कार्यक्रमाचे ऐतिहासिक महत्त्व आणखी वाढले आहे. ही केवळ पं. चौधरी यांची वैयक्तिक गौरवकथा नसून संपूर्ण भारतीय शास्त्रीय संगीत परंपरेसाठीही एक अभिमानाचा क्षण ठरला आहे.

संगीत शास्त्रीय सिद्धांतानुसार गुरूंच्या मार्गदर्शनाखाली घराणेदार रचना पुनर्गठीत करून सादरीकरणाची भव्यता वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न युवा पिढीपर्यंत पोहचवणे म्हणजेच संगीतकलेचा खरा उत्कर्ष होय. अशीच संगीतसेवा व रागदारी संगीत कलेत स्वतःला अर्पण करण्याचे कार्य पं. उमेश चौधरी यांनी केले आहे. भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी यांच्या धार्मिक व सात्विक गुणांनी प्रेरित होऊन त्यांनी या क्षेत्रात पदार्पण केले. संगीत क्षेत्राला जबाबदारी मानून, बुवांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून पं. चौधरी यांनी गायनकलेतील प्रत्येक बारकावे आत्मसात केले. त्यामुळेच आज ते संपूर्ण भारतभर शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम करत आहेत. आकाशवाणीवर शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम करणारे वारकरी सांप्रदायातील रायगड जिल्ह्यातील एकमेव अद्वितीय आहेत.

चौधरींना पंडित ही उपाधी लाभली असली तरी ते स्वतःला आजही विद्यार्थी समजतात. नवनवीन शिकवण आत्मसात करण्याची वृत्ती, गुरुपरंपरेचे भान आणि संगीतकलेला वाहिलेली अखंड साधना या गुणांमुळे त्यांची गायकी देशाच्या कानाकोपऱ्यात आदराने स्वीकारली जात आहे. रसायनशास्त्राचे पदवीधर असलेले पं. चौधरी यांचा व्यावसायिक प्रवास उद्योगक्षेत्रातून सुरू झाला, परंतु अंतर्मनातील स्वरांचा शोध अखेरीस त्यांना संगीताच्या अथांग सागरात घेऊन गेला. २००३मध्ये चेंबूर येथे झालेल्या अल्लादिया खाँ स्मृती समारंभात उस्ताद अस्लम हुसैन खान यांचे गायन ऐकून ते इतके प्रभावित झाले की त्यांनी तत्काळ त्यांचे शिष्यत्व स्वीकारले. त्यानंतर नोकरीचा राजीनामा देत त्यांनी पूर्णवेळ संगीतसाधना आणि गानप्रवास सुरू केला.

आज पं. उमेश चौधरी आग्रा व जयपूर-अत्रौली घराण्याचे प्रमुख वारसदार मानले जातात. संगीत म्हणजे केवळ मनोरंजन नव्हे, तर समाजसेवेचे आणि आत्मशुद्धीचे एक प्रभावी साधन आहे, हे आपल्या कार्यातून ज्यांनी सिद्ध केले ते म्हणजे पं. चौधरी. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे त्यांनी १९२ तास अखंड भजन महोत्सव यशस्वीरीत्या आयोजित केला आणि त्या अद्वितीय उपक्रमाची नोंद लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली.

संगीत क्षेत्राला समाजजागृतीचे माध्यम मानत त्यांनी अवयवदान सारख्या महत्त्वाच्या विषयावर लोकसहभाग घडवून आणला तसेच म्युझिक थेरपी सारख्या उपक्रमांद्वारे संगीताच्या आरोग्यदायी अंगाला अधोरेखित केले. त्यांचे भजन व शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम सह्याद्री दूरदर्शनवर वारंवार प्रसारित होऊन असंख्य रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळावे या हेतूने त्यांनी मासिक सभा या उपक्रमाची सुरुवात केली आणि अनेकांना संधी उपलब्ध करून दिली.

गुरूजनांचा आशिर्वाद, रसिकांचे प्रेमळ पाठबळ आणि शिष्यांना दिलेले प्रामाणिक मार्गदर्शन या त्रिसूत्रीमुळे पं. उमेश चौधरी हे खरे अर्थाने शास्त्रीय संगीताचे सेवक म्हणून ओळखले जातात.

*आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण*
*स्वरांनी भारलेला राहो,*
*आरोग्य, आनंद आणि यशाचा*
*मंगल गजर सतत घुमत राहो,*
*आपल्या कला-सेवेत अखंड*
*ऊर्जा आणि प्रेरणा लाभो...*
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**-पं. शंकरराव गोडबोले**

# भारत-ऑस्ट्रेलिया कसोटी रोमांचक स्थितीत

**ब्रिस्बेन : वृत्तसंस्था**

भारतीय महिला 'अ' संघ आणि ऑस्ट्रेलियन महिला 'अ' संघ यांच्यात सुरू असलेला कसोटी सामना अत्यंत रोमांचक स्थितीत पोहचला आहे. भारताने आता सामन्यावर आपली पकड मजबूत करण्यास सुरुवात केली असून कांगारू संघ काहीसा पिछाडीवर असल्याचे चित्र आहे. पहिल्या दिवशी भारतीय संघ दबावाखाली होता, तशीच काहीशी अवस्था दुसऱ्या दिवसाचा खेळ संपताना ऑस्ट्रेलिया संघाची झाली. दुसऱ्या दिवशी भारताने जोरदार पुनरागमन करत ऑस्ट्रेलियाला बॅकफूटवर ढकलले.

भारतीय महिला 'अ' संघ सध्या ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर आहे. या दौऱ्यात सुरुवातीला टी-२० मालिका, त्यानंतर वनडे मालिका खेळवण्यात आली आणि आता अखेरीस कसोटी सामना खेळवला जात आहे. विशेष म्हणजे, हा कसोटी सामना पाच दिवसांचा नसून केवळ चार दिवसांचा आहे. पहिल्या दिवशी भारतीय संघ फलंदाजीसाठी मैदानात उतरला, परंतु १०० धावा होण्यापूर्वीच संघाचे पाच गडी बाद झाले, मात्र दुसऱ्या दिवशी भारतीय संघाने उत्कृष्ट खेळ करत आपली धावसंख्या २९९पर्यंत पोहचवली.

भारतासाठी राघवी बिष्टने ९३ धावांची महत्त्वपूर्ण खेळी साकारली. या खेळीदरम्यान तिने १६ चौकार लगावले. तिचे शतक हुकले असले तरी तिने संघाला मजबूत स्थितीत पोहचवण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. इतकेच नव्हे तर, खालच्या फळीतील व्ही.जे. जोशीताने ५१ धावांचे योगदान दिले. यामुळेच भारतीय संघाला जवळपास ३०० धावांचा टप्पा गाठता आला. एका क्षणी २०० धावांचा आकडाही मोठा वाटत होता, परंतु टीम इंडियाच्या महिला खेळाडूंनी कमालीची झुंजार वृत्ती दाखवत एक सन्मानजनक धावसंख्या उभारली.

यानंतर फलंदाजीसाठी उतरलेला ऑस्ट्रेलियन संघ बॅकफूटवर गेला आहे. दुसऱ्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा, ऑस्ट्रेलिया संघाने १५८ धावांवर आपले पाच गडी गमावले होते. भारताकडून कर्णधार राधा यादव आणि सायमा ठाकूर यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले, तर तितास साधूने एक बळी मिळवला.

ऑस्ट्रेलियन संघ अजूनही भारताच्या धावसंख्येपेक्षा १४१ धावांनी पिछाडीवर आहे आणि सामन्याचे दोन दिवस शिल्लक आहेत. ऑस्ट्रेलियाचा डाव लवकरात लवकर गुंडाळून पहिल्या डावात आघाडी घेण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न असेल. ही आघाडी दुसऱ्या डावात अत्यंत उपयुक्त ठरू शकते. त्यामुळे सामन्याचे उर्वरित दोन दिवस अत्यंत महत्त्वपूर्ण आणि रोमांचक ठरण्याची शक्यता आहे.

# तपस्या गेहलोतने रचला इतिहास!

## ज्युनिअर जागतिक कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक

**सामोकोव्ह : वृत्तसंस्था**



डिलांचे कुस्तीपटू बनण्याचे अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करत आणि आपल्या दिवंगत आजोबांना दिलेला शब्द पाळत हरियाणाच्या १९ वर्षीय तपस्या गेहलोतने ज्युनिअर जागतिक कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. महिलांच्या ५७ किलो वजनी गटात तिने मिळवलेले हे देदीप्यमान यश भारतासाठी या स्पर्धेतील पहिले सुवर्ण ठरले. अंतिम सामन्यात तिने नॉर्वेच्या फेलिसिटास डोमाजेवाचा पराभव केला, पण त्याआधी उपांत्य फेरीत सलग ४० आंतरराष्ट्रीय लढतींमध्ये अजिंक्य राहिलेल्या जपानच्या गतविजेत्या सोवाका उचिदाला धूळ चारून तिने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

तपस्यासाठी हा विजय केवळ शारीरिक कौशल्याचाच नव्हे, तर प्रचंड मानसिक धैर्याचाही होता. स्पर्धेसाठी दिल्लीतील राष्ट्रीय शिबिरात प्रशिक्षण घेत असतानाच अवघ्या आठवडाभरापूर्वी तिच्या आजोबांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. या दुःखद बातमीने खचलेल्या तपस्याने घरी परतावे का असा विचार केला, मात्र तिचे वडील प्रमेश गेहलोत यांनी तिला खंबीर राहण्यास सांगितले. तुझ्या आजोबांनी तुला शेवटचे काय सांगितले होते हे लक्षात ठेव. विश्वविजेती म्हणूनच घरी परत ये, अशी त्यांची इच्छा होती या वडिलांच्या शब्दांनी तपस्याला नवी ऊर्जा दिली आणि तिने शिबिरातच राहून आपले प्रशिक्षण सुरू ठेवले.

स्पर्धेत सुरुवातीच्या फेऱ्या सहज जिंकल्यानंतर उपांत्य फेरीत तपस्यासमोर जपानच्या सोवाका उचिदाचे मोठे आव्हान होते. उचिदा केवळ गतविजेतीच नव्हती, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर ती सलग ४० सामन्यांपासून अपराजित होती. या अटीतटीच्या लढतीत शेवटच्या काही सेकंदात निर्णायक डाव टाकत तपस्याने ४-३ अशा फरकाने विजय मिळवला व अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामना तुलनेने अधिक सरळ ठरला. नॉर्वेच्या फेलिसिटास डोमाजेवावर सुरुवातीपासूनच वर्चस्व राखत तपस्याने सामना ५-२ असा जिंकला व भारताच्या खात्यात पहिल्या सुवर्णपदकाची नोंद केली.

# महिला वनडे वर्ल्डकपचे बंगळुरूमधील सामने स्थलांतरित

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतात होणाऱ्या आगामी महिला विश्वचषक स्पर्धेच्या वेळापत्रकात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. बंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर होणारे सामने आता नवी मुंबई व गुवाहाटीतील मैदानावर खेळवण्याचा निर्णय आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) घेतला आहे.

भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त यजमानपदाखाली महिला वनडे विश्वचषकचे आयोजन होणार असून यात एकूण आठ संघ सहभागी होतील. तथापि, स्पर्धा सुरू होण्यापूर्वीच बंगळुरू येथे झालेल्या एका दुर्दैवी घटनेमुळे आयसीसीला वेळापत्रकात हे फेरबदल करावे लागले आहेत.

आयपीएलचे विजेतेपद रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने पटकावल्यानंतर या विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी आरसीबीचे खेळाडू बंगळुरूच्या स्टेडियमवर एकत्र आले होते. त्या वेळी झालेल्या चेंगराचेंगरीत अनेक चाहत्यांना प्राण गमवावे लागले होते.

**नवी मुंबई, गुवाहाटीला होणार सामने**

बंगळुरू येथील सामने रद्द झाल्याने त्यांचे आयोजन नवी मुंबई आणि गुवाहाटी येथे करण्यात आले आहे तसेच कोलंबो येथील एक सामनाही नवी मुंबईला स्थलांतरित करण्यात आला आहे. नवीन वेळापत्रकानुसार अंतिम सामना नवी मुंबई किंवा श्रीलंकेतील कोलंबो येथे होण्याची दाट शक्यता आहे.

# पुरुषांच्या १० मीटर एअर रायफलमध्ये भारताला 'सुवर्ण'

**शिमकेंट : वृत्तसंस्था**

आशियाई नेमबाजी चॅम्पियनशिपमध्ये भारतीय नेमबाजांनी आपली विजयी घोडदौड कायम ठेवली असून पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल सांघिक प्रकारात अर्जुन बाबुटा, रुद्रांक्ष पाटील आणि किरण जाधव यांच्या त्रिकुटाने सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले. भारतीय संघाने एकत्रितपणे १,८९२.५ गुणांची कमाई करत चीनच्या संघाला मागे टाकले.

वरिष्ठ गटातील या यशाबरोबरच स्पर्धेच्या कनिष्ठ गटातही भारतीय खेळाडूंनी आपला दबदबा कायम ठेवला. कनिष्ठ महिलांच्या स्कीट प्रकारात मानसी रघुवंशीने अंतिम फेरीत ५३ गुणांची नोंद करत सुवर्णपदकाला गवसणी घातली. याच स्पर्धेत भारताच्याच यशस्विनी राठोडने ५२ गुणांसह रौप्यपदक जिंकले.

## कनिष्ठ गटातही दबदबा




कनिष्ठ पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारातही भारताने 'सुवर्ण' कामगिरी केली. अत्यंत चुरशीच्या झालेल्या वैयक्तिक अंतिम लढतीत भारताच्या अभिनव शॉने २५०.४ गुणांसह सुवर्णपदक पटकावले. त्याने दक्षिण कोरियाच्या ली ह्यून-सेओला (२५०.३) केवळ ०.१ गुणाच्या निसटत्या फरकाने मागे टाकले. चीनच्या मा सिहानने २२९.२ गुणांसह कांस्यपदक जिंकले.

# रायगड जिल्हा बास्केटबॉल निवड चाचणी खारघरला

**पनवेल** : बास्केटबॉल असोसिएशन ऑफ रायगडच्या वतीने १३ वर्षाखालील मुले व मुलींसाठी जिल्हा निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन मुलांकरिता २३ ऑगस्ट व मुलींकरिता २४ ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० वाजता विब्ग्योर शाळा, से. १५, खारघर येथे करण्यात आले आहे. या चाचणीतून निवडलेला संघ ११ ते १६ सप्टेंबरदरम्यान सोलापूर येथे होणाऱ्या १३ वर्षाखालील राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करेल.

खेळाडूंनी निवड चाचणीसाठी येताना दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, वयाचा पुरावा (जन्म प्रमाणपत्र) व निवासाचा पुरावा (आधार कार्ड किंवा समकक्ष कागदपत्र) सोबत आणणे बंधनकारक आहे. जिल्ह्यातील सर्व बास्केटबॉलपटूंनी या निवड चाचणीत मोठ्या संख्येने व उत्साहाने सहभाग घ्यावा तसेच अधिक माहितीसाठी मंदार म्हात्रे (८८५०८००२९९) किंवा आकाश चाकणे (९०२९५९६९४९) यांच्याशी संपर्क साधावा, महाराष्ट्र बास्केटबॉल संघटनेचे उपाध्यक्ष व बास्केटबॉल असोसिएशन ऑफ रायगडचे अध्यक्ष आमदार विक्रांत पाटील यांनी केले आहे.

# राज्यस्तरीय पिंच्याक सिलॅट स्पर्धेत पनवेलच्या खेळाडूंचे सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिएशनने १५व्या पिंच्याक सिलॅट राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन नुकतेच क्राइस्ट अकॅडमी स्कूल कोपरखैरणे, नवी मुंबई येथे केले होते. या स्पर्धेत पनवेलच्या खेळाडूंनी चार सुवर्ण, चार रौप्य व तीन कांस्यपदके मिळवून सुयश संपादन केले.

प्री-टेन, सब ज्युनिअर, ज्युनिअर वयोगटातील मुला मुलींसाठी घेण्यात आलेल्या या स्पर्धेत २६ जिल्ह्यांतील ४८५ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये पनवेलमधील तनिष्का मिश्रा, अर्चित जाधव, भावेश पाटील, ध्रुव सिंह यांनी सुवर्ण; स्वयम राम, शौर्य वर्धन दांडी, चैतन्य काकडे, आयुषी शिंदे यांनी रौप्य; तर दर्शित माळी, स्वर्ण भोईर, सानिया शेख यांनी कांस्यपदक प्राप्त केले. या खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक योगेश बैकर व विरेश राठोड यांचे मार्गदर्शन लाभले

पदक विजेत्या खेळाडूंची २६ ते २८ सप्टेंबर रोजी कर्नाटकातील हुबळी येथे होणाऱ्या १३व्या राष्ट्रीय पिंच्याक सिलॅट स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या खेळाडूंचे पिंच्याक सिलॅट असोसिएशन महाराष्ट्रचे अध्यक्ष किशोर येवले, पिंच्याक सिलॅट असोसिएशन ऑफ पनवेलचे चेअरमन मंदार पनवेलकर, अध्यक्ष निलेश भोसले, सचिव प्रतिक कारंडे, उपाध्यक्ष सुरेश राठोड यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# नवीन क्रीडा धोरण लागू

**नवी दिल्ली** : भारत आणि पाकिस्तान यापुढे कोणत्याही द्विपक्षीय क्रीडा सामन्यांमध्ये सहभागी होणार नाहीत. तथापि, पुढील महिन्यात होणाऱ्या बहुपक्षीय आशिया चषक स्पर्धेत खेळण्यापासून भारतीय क्रिकेट संघाला रोखले जाणार नाही, असे क्रीडा मंत्रालयाने स्पष्ट केले. मंत्रालयाने भारताच्या आंतरराष्ट्रीय क्रीडा संबंधांवर विशेष लक्ष केंद्रित करणारे नवीन धोरण जाहीर केले आहे. हे धोरण तत्काळ प्रभावाने लागू झाल्याचे सूत्रांनी सांगितले.

आशिया चषक ही एक बहुपक्षीय स्पर्धा असल्याने आम्ही भारतीय क्रिकेट संघाला त्यात खेळण्यापासून रोखणार नाही, असे मंत्रालयातील सूत्राने स्पष्ट केले. ऑलिम्पिक सनदेच्या नियमांचे पालन करण्यास बांधील आहोत, असेही पुढे सांगितले.







लोकनेते मा. खासदार श्री रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त
श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आयोजित



रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा




शनिवार दिनांक २३ ऑगस्ट २०२५
स्थळ : श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ हॉल, प्लॉट नं ४७५, मार्केट यार्ड, पनवेल

| भजन मंडळाचे नाव | पत्ता | बुवांची नावे | वेळ |
|---|---|---|---|
| गावदेवी प्रासादिक भजन मंडळ पेणधर | मु. पेणधर, पो. नावडे, ता. पनवेल | कु. पंकज यशवंत कोपरकर | स. १०.०० |
| श्री दत्त प्रासादिक भजन मंडळ वावंजे | मु. पो. वावंजे, ता. पनवेल | धिरज विष्णू दाढावकर | स. १०.३० |
| कुलस्वामिनी प्रासादिक भजन मंडळ ओवेपेठ | मु. ओवेपेठ, खारघर, ता. पनवेल, | कु. एकता एकनाथ भाग्यवंत | स. ११.०० |
| श्री पांडूरंग प्रासादिक भजन मंडळ खारघर गाव | खारघर गाव, सेक्टर १३, खारघर | कु. प्राप्ती गोरखनाथ पाटील | स. ११.३० |
| शारदा संगीत भजन मंडळ विचुंबे | मु. विचुंबे, ता. पनवेल, | श्री. दिलीप बामा म्हात्रे | दु. १२.०० |
| जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ वलप | मु. वलप, ता. पनवेल, | श्री. विश्वनाथ रघूनाथ पाटील | दु. १२.३० |
| नवदुर्गा प्रासादिक भजन मंडळ कोपरा | कोपरा, खारघर, ता. पनवेल | सौ. शिवमालाताई पाटील | दु. ०२.०० |
| राधाकृष्ण प्रासादिक भजन मंडळ वावंजे | मु. पो. वावंजे, ता. पनवेल | तेजस्वी संतोष पाटील | दु. ०२.३० |
| श्री सद्गुरु वामनबाबा प्रासादिक भजन मंडळ | मु. सिध्दीकरवले, पो. करवले | श्री. दिनेशबुवा पाटील | दु. ०३.०० |
| श्री दत्त प्रासादिक भजन मंडळ गव्हाण | मु. पो. गव्हाण, ता. पनवेल | श्री. देवानंद कोळी | दु. ०३.३० |
| जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ वाजे | मु. वाजे, ता. पनवेल | कु. सानिया भगत | सायं. ०४.०० |
| श्री विश्वविजयनाथ सुहास्य संगीत विद्यालय | मु. पो. दिघोडे, ता. उरण | कु. मृणाली विकास ठाकूर | सायं. ०४.३० |
| श्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ खारघर | खारघर गाव | श्री. अमित पद्माकर पाटील | सायं. ०५.०० |
| जय श्री राधे गोविंद भक्ती समुह | सेक्टर ५ कामोठे, पनवेल | श्री. अनिल खोसरे | सायं. ०५.३० |
| सिध्देश्वर प्रासादिक भजन मंडळ | मु. तळोजे मजकूर, ता. पनवेल | सौ. तृप्ती अविनाश पाटील | सायं. ०६.०० |

रविवार दिनांक २४ ऑगस्ट २०२५
स्थळ : श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ हॉल, प्लॉट नं ४७५, मार्केट यार्ड, पनवेल

| भजन मंडळाचे नाव | पत्ता | बुवांची नावे | वेळ |
|---|---|---|---|
| श्रीराम वरदायिणी भजनी मंडळ उलवे | साई प्राईड, से. १९, उलवे | सागर मारुती उतेकर | स. ०९.३० |
| श्री स्वामी समर्थ भजन मंडळ अंजप | मु. अंजप, पो. वाकस | शाम काळूराम मिनमीने | स. १०.०० |
| जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ खोपोली | खोपोली, खालापूर | सौ. रेश्मा नितीन जोशी | स. १०.३० |
| श्री सद्गुरु कृपा प्रा.महिला भजन मंडळ चिंचवली | खालापूर | सौ. प्रिती प्रयाग जाधव | स. ११.०० |
| श्री. गंगादेवी भजन मंडळ | मु. पो. ता. अलिबाग, | श्री. समर्थ सखाराम पाटील | स. ११.३० |
| श्री सिध्देश्वर प्रा.सं. भ..मंडळ आ.(पाठक माळी) | आवास, ता.अलिबाग | भुषण किशोर माळवी | दु. १२.०० |
| श्रीपती बाबा प्रासादिक भजन मंडळ | मु. कोलीवळी (नेरुळ) | कु. चंदना आत्माराम डांगरे | दु. १२.३० |
| शिरसाई प्रासादिक महिला भजन मंडळ शिरसे | मु. शिरसे, पो. कोंदीवडे | सौ. प्रणिता देशमुख | दु. ०२.०० |
| स्वरविहार भजन मंडळ अलिबाग | गोंधळपाडा, अलिबाग | विशाल विजय महाडिक | दु. ०२.३० |
| श्री सोमजाईदेवी प्रासादिक भजन मंडळ | मु. पो. खरसई, ता. म्हसळा | कु. भावेश संतोष शितकर | दु. ०३.०० |
| कै. वैजयंती माता भजन मंडळ सावळे रसायनी | मु. सावळे, पो. रसायनी | कु. श्रध्दा नितीन माळी | दु. ०३.३० |
| आई एकविरा महिला भजन मंडळ | मु. दुंदरेपाडा, पो. मोरबे | सौ. सुजाता पाटणकर | सायं. ०४.०० |
| सुरताल भजन मंडळ नारंगी | मु. नारंगी, पो. डोनवत | श्री. रुपेश अनिल देशमुख | सायं. ०४.३० |
| ओम साई भजन मंडळ खरसुंडी | रा. खरसुंडी, ता. खालापूर | हर्षदा सुशांत सालेकर | सायं. ०५.०० |
| ओंकार संगीत भजन मंडळ नेरळ | सद्गुरु कृपा बंगला,नेरळ | सौ. मंजिरी सागर सावंत तेरसे | सायं. ०५.३० |


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com